अ



दैनिक

# राज्य लोकतंत्र



www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव ● लातुर जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

नवरात्रोत्सवानिमित्त सर्व भाविक-भक्तांना हार्दिक शुभेच्छा !

बीड - महाराष्ट्र | वर्ष-६ | अंक-२०५ | शुक्रवार दि.१६ ऑक्टोबर २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

# शेतकऱ्यांची मदत अपुरी; सत्ताधारी तटकरेंचा सरकारला घरचा आहेर!

## अजितदादांच्या अर्थकारभाराचे कौतुक करत मुख्यमंत्र्यांच्या अर्थ खात्यावर अप्रत्यक्ष निशाणा; वाढीव मदतीसाठी भेट घेणार

धाराशिव । प्रतिनिधी

**राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना सरकारने जाहीर केलेली पाच हजार रुपयांची अग्रीम मदत अपुरी पडत असल्याच्या मुद्यावरून आता सत्ताधारी गोटातूनच सरकारला घरचा आहेर मिळाला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी दिवंगत अजित पवार यांच्या अर्थ खात्यातील शिस्तबद्ध कारभाराचे कौतुक करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सांभाळत असलेल्या अर्थ खात्यावर अप्रत्यक्ष टीका केली. शेतकऱ्यांना वाढीव आर्थिक मदत मिळावी, यासाठी मुख्यमंत्र्यांची भेट घेणार असल्याचेही तटकरे यांनी स्पष्ट केले. त्यामुळे शेतकऱ्यांच्या मदतीचा मुद्दा सत्ताधारी महायुतीतही चर्चेचा विषय ठरला आहे.**




दुष्काळाच्या संकटामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. पिकांचे नुकसान, घटलेले उत्पादन आणि शेतीवरील वाढता खर्च अशा परिस्थितीत दिवाळीच्या तोंडावर जाहीर करण्यात आलेली पाच हजार रुपयांची अग्रीम मदत कितपत पुरेशी ठरणार, असा सवाल उपस्थित होत आहे. शेतकऱ्यांकडून या मदतीवर नाराजी व्यक्त होत असतानाच तटकरे यांनीही मदत वाढविण्याची गरज अधोरेखित केली. त्यामुळे शेतकऱ्यांच्या अपुऱ्या मदतीचा प्रश्न केवळ विरोधकांपुरता मर्यादित राहिलेला नसून, सत्ताधारी पक्षातील नेत्यांकडूनही त्यावर प्रश्न उपस्थित केले जात असल्याचे चित्र आहे. धाराशिव येथे प्रसारमाध्यमांशी बोलताना तटकरे यांनी अजित पवार अर्थमंत्री असतानाच्या कारभाराचा दाखला ▶▶ पान २ वर

### मंत्री, आमदारांनी पाच हजारात दिवाळी करून दाखवावी-अंबादास दानवे

दुष्काळाने शेतकऱ्यांची उभी पिकं जळाली आहेत, हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला आहे. अशा परिस्थितीत पाच हजार रुपयांत दिवाळी कशी साजरी करायची? असा सवाल शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते अंबादास दानवे यांनी उपस्थित केला आहे. पाच हजार रुपयांत दिवाळी साजरी होत असेल, तर या दिवाळीला सत्ताधारी पक्षाच्या मंत्र्यांना आणि आमदारांना आम्ही पाच हजार रुपयांचे गिफ्ट देतो. त्यांनीही याच रकमेत दिवाळी साजरी करुन दाखवावी, असा थेट टोला दानवे यांनी सरकारला लगावला आहे.

## माळ सहावी



षष्ठीचे दिवशीं भक्तां आनंद वर्तला हो ॥
घेउनि दिवट्या हस्तीं हर्षे गोंधळ घातला हो ।
कवडी एक अर्पितां देवी हार मुक्ताफळां हो ॥
जोगवा मागतां प्रसन्न झाली भक्तकुळा हो ॥६॥
उदो बोला उदो अंबाबाई माउलीचा हो ।
उदोकारें गर्जती काय महिमा वर्णू तिचा हो ॥

## थोडक्यात...

### शेतकऱ्यांना हेक्टरी १ लाख रुपये सरसकट द्या-सपकाळ

वाशिमः शेतकऱ्यांना तुटपुंज्या मदतीची खैरात नको. त्यांना हेक्टरी १ लाख रुपये सरसकट मदत आणि संपूर्ण कर्जमाफी द्यावी. जनावरांसाठी तातडीने चारा छावण्या, शेतमजुरांना सानुग्रह अनुदान, विद्यार्थ्यांची शैक्षणिक फी माफ आणि पिण्याच्या पाण्याचे योग्य नियोजन करावे, अशा मागण्या काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केल्या आहेत. अस्मानी संकटाने शेतकरी उद्ध्वस्त झाला आहे. तर सरकारच्या असंवेदनशीलतेने त्याच्या जखमेवर मीठ चोळले आहे. दिवाळी गोड करण्याच्या वल्गना करणाऱ्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने अवघ्या ५ हजार रुपयांची अग्रीम मदत जाहीर करून शेतकऱ्यांची थट्टा केली आहे, अशी टीका त्यांनी केली. सर्वेक्षण, बैठका आणि घोषणांचे फार्स बंद करा. शेतकऱ्यांच्या खात्यात प्रत्यक्ष मदत जमा करा. शेतकऱ्यांना न्याय मिळेपर्यंत काँग्रेसचा संघर्ष थांबणार नाही, असा इशारा त्यांनी दिला.

### दुसऱ्या धर्मात गेल्यास आरक्षण नाही-न्यायालय

दिल्लीः धर्मांतर केल्यानंतर देखील आरक्षण मागणाऱ्या लोकांना सर्वोच्च न्यायालयाने मोठा झटका दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाने एक मोठा निर्णय देत धर्म बदलल्यानंतर आरक्षण संपुष्टात येते, धर्मांतरानंतर तुम्हाला आरक्षणाचा लाभ मिळणार नाही असे स्पष्ट केले आहे. हिंदू धर्म सोडून इस्लाम धर्म स्विकारल्यास कोणतेही आरक्षण मिळणार नाही. सर्वोच्च न्यायालयाने मद्रास उच्च न्यायालयाचा निर्णय कायम ठेवला आहे. मद्राच उच्च न्यायालयाने तमिळनाडू सरकारचा एक आदेश रद्द केला आहे. सरकारच्या त्या आदेशात मागासवर्गीय, अतीमागासवर्गीय, आणि अनुसूचित जातींमधील लोकांनी इस्लाम धर्म स्विकारला तर त्यांना मागास मुस्लीम वर्ग मानण्यात येईल असा उल्लेख होता. सर्वोच्च न्यायालयाच्या जस्टीस प्रशांत कुमार मिश्रा आणि जस्टीस चंद्रशेखर यांच्या बेंचने धर्मांतर आणि आरक्षणाबाबत हा निर्णय दिला.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,
बीड, दि.१३ ऑक्टोबर २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १८.५० क्विंटल | २,७०० | ३,१०१ | २,९०० |
| ज्वारी/हायब्रिड: १४४.०० क्विंटल | ३,१०० | ६,६६० | ५,०६७ |
| मका/लोकल: १.०० क्विंटल | २,३०० | २,३०० | २,३०० |
| तूर : १.०० क्विंटल | १०,००० | १०,००० | १०,००० |
| उडीद : १४.०० क्विंटल | ९,६०० | ९,८५१ | ९,७३७ |
| बाजरी: ४६.५० क्विंटल | २,९०० | ३,१३४ | २,९९२ |
| मुग: ३.०० क्विंटल | ९,८०० | १०,००० | ९,९०० |
| सोयाबीन: ३५७.५० क्विंटल | ६,२७० | ७,००० | ६,७३८ |
| हरभरा: ७.५० क्विंटल | ६,७०० | ७,६०० | ७,१३० |

# ज्ञानेश कुमार यांच्यासह दोन्ही निवडणूक आयुक्तांना नोटीस!

## राहुल गांधींच्या याचिकेवर सुप्रीम कोर्टाची मोठी कारवाई

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधातील आंदोलन आणि निवडणूक आयोगाच्या कामकाजावरून गुरुवारी सुप्रीम कोर्टात महत्त्वाची सुनावणी झाली. या सुनावणीदरम्यान न्यायालयाने लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि इंडिया आघाडीच्या नेत्यांनी दाखल केलेल्या याचिकेवर निवडणूक




आयोग, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि अन्य दोन निवडणूक आयुक्तांना नोटीस बजावली. तसेच, राहुल गांधी यांना समर्थकांसह सुप्रीम कोर्टात येण्याच्या मुद्द्यावर स्पष्टीकरण देण्यास सांगितले आहे.

दुसरीकडे, दिल्लीतील आंदोलनादरम्यान पोलिसांनी केलेली कारवाई, मेट्रो स्थानकांवरील निर्बंध आणि इंटरनेट सेवा बंद केल्याच्या आरोपांवरही न्यायालयात सुनावणी झाली. या प्रकरणाशी संबंधित सीसीटीव्ही फुटेज सुरक्षित ठेवून न्यायालयात सादर करण्याचे निर्देशही देण्यात आले. याशिवाय, जंतर-मंतर येथील आंदोलनाची जागा रद्द करण्याच्या मागणीवरून केंद्र सरकार आणि दिल्ली पोलिसांनाही नोटीस बजावण्यात आली. निवडणूक आयोगाचे कामकाज आणि ▶▶ पान २ वर

# राज्यातील सर्व शाळांमध्ये स्काऊट-गाईड बंधनकारक; मंत्री दादा भुसे यांचे निर्देश

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यातील सर्व माध्यमांच्या १ लाख ८ हजार शाळांमधील सुमारे २ कोटी १० लाख विद्यार्थ्यांना स्काऊट-गाईडचे प्रशिक्षण बंधनकारक करण्याचे निर्देश शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी दिले. मंत्री भुसे यांनी सर्व शाळांमध्ये स्काऊट-गाईडचा विस्तार करण्याबाबत बैठक घेतली.**



राज्यातील ३० हजार शाळांमधील सुमारे १७ लाख ३३ हजार विद्यार्थ्यांना सध्या स्काऊट-गाईडचे प्रशिक्षण दिले जाते. या प्रशिक्षणाची व्याप्ती राज्यातील सर्व माध्यमांच्या शाळांपर्यंत वाढविण्याचे निर्देश त्यांनी दिले. राष्ट्र प्रथम ही संकल्पना केंद्रस्थानी ठेवून शालेय शिक्षण विभाग काम करीत आहे. त्यामुळे सर्व शाळांमध्ये स्काऊट-गाईड असणे आवश्यक आहे. या उपक्रमांतर्गत परेड, संचलन आणि देशभक्तिपर गीतांवरील कवायत बंधनकारक करावी. तसेच आनंददायी शनिवार उपक्रमांतर्गत आठवड्यातून दोन तासिका यासाठी घेण्यात याव्यात, असे निर्देश भुसे यांनी ▶▶ पान २ वर

# ठाकरे सेनेचा दसरा मेळावा शिवाजी पार्कवरच

मुंबई । प्रतिनिधी

यंदाच्या दसरा मेळाव्यासाठी दादर येथील छत्रपती शिवाजी महाराज पार्कवर सभा घेण्याचा उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचा मार्ग मोकळा झाला आहे. दसरा मेळाव्यासाठी उद्धवसेनेकडून खासदार अनिल देसाई यांचा एकमेव अर्ज आल्याने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जी उत्तर विभागाने त्यांना परवानगी दिली आहे. त्यामुळे आता शिवसेना उबाठा पक्षाचा दसरा मेळावा येथे होईल. येत्या २० ऑक्टोबरला होणाया या मेळाव्याला पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हे मार्गदर्शन करणार आहेत.

शिवसेनेत फूट पडल्यानंतर शिवसेना उबाठा आणि शिवसेनेचे दोन वेगवेगळे मेळावे होतात. दसरा मेळावा हा राजकीय वर्तुळामध्ये महत्त्वाचा मानला जातो. यंदाही शिवाजी पार्कवर दसरा मेळाव्यासाठी फक्त शिवसेना ठाकरे पक्षाने अर्ज केला होता. त्यांच्या अर्जाव्यतिरिक्त एकाही राजकीय पक्षाचा अर्ज महापालिकेकडे सादर झाला नाही. २०२२ मध्ये शिवाजी पार्कवर दसरा मेळावा घेण्यासाठी ▶▶ पान २ वर

# एमपीएससी चौकशी समितीबाबत तुकाराम मुंढेंना अधिकृत पत्रच नाही!

मुंबई । प्रतिनिधी

## 'तोंडी चर्चा झाली, पण अधिकृत नोटिफिकेशन आलेले नाही'; पेपरफुटी प्रकरणाच्या चौकशीबाबत संभ्रम कायम

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षांमधील पेपरफुटी आणि गैरप्रकारांच्या चौकशीसाठी स्थापन करण्यात येणाऱ्या समितीच्या सचिवपदावर नियुक्ती होणार असल्याची चर्चा असतानाच, अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी आपल्याला अद्याप कोणतेही अधिकृत पत्र किंवा नोटिफिकेशन मिळाले नसल्याचे स्पष्ट केले आहे. यासंदर्भात तोंडी चर्चा झाली असली, तरी अधिकृत आदेश मिळेपर्यंत यावर भाष्य करणे योग्य नसल्याचे त्यांनी सांगितले.




पुण्यात स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी केलेल्या आंदोलनादरम्यान राज्य सरकारच्या वतीने एमपीएससीच्या परीक्षांतील पेपरफुटी आणि गैरप्रकारांच्या चौकशीसाठी स्थापन करण्यात येणाऱ्या समितीच्या सचिवपदी तुकाराम ▶▶ पान २ वर



# नैऋत्य मान्सून संपूर्ण देशातून परतला

मुंबई । प्रतिनिधी

नैऋत्य मान्सून संपूर्ण देशातून पूर्णपणे परतला आहे, अशी माहिती शुक्रवारी (दि.१५) भारतीय हवामान विभागाने दिली. तसेच हवामान विभागाने दक्षिण भारतातील काही भागांत ईशान्य मान्सूनच्या आगमनाचीही घोषणा केली. तामिळनाडू, पुद्दुचेरी, कराईकल, किनारपट्टीवरील आंध्र प्रदेश, रायलसीमा, दक्षिण अंतर्गत कर्नाटक, केरळ आणि माहे येथे ईशान्य मान्सूनमुळे पावसाची ▶▶ पान २ वर

# एसटी कर्मचाऱ्यांचा ६ नोव्हेंबरपासून संपाचा इशारा!



मुंबई । प्रतिनिधी

एसटी कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांवरून कर्मचारी संघटनांनी ६ नोव्हेंबरपासून राज्यव्यापी संपाचा इशारा दिला आहे. मागण्यांबाबत मुख्यमंत्री यांना निवेदन देण्यात आले असून, शासनाने सकारात्मक निर्णय न घेतल्यास कामबंद आंदोलन करण्यात येणार आहे.

कर्मचाऱ्यांना दर महिन्याच्या ७ तारखेला ▶▶ पान २ वर

# सतीश भाऊंच्या प्रचाराला मित्र पक्षांचा टाटा बाय-बाय




छ. संभाजीनगर । प्रतिनिधी

मराठवाडा पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे विद्यमान आमदार सतीश चव्हाण हे महायुतीचे उमेदवार आहेत प्रामुख्याने सुरुवातीपासूनच सतीश चव्हाण यांच्या प्रचार यंत्रणेकडून चुकावर चुका होत गेल्याने मराठवाड्यातील असताना त्यांच्या बैठकांना मात्र सहकारी भाजप शिवसेना एकनाथ शिंदे गट यांची अनुपस्थिती जाणवल्यामुळे त्यांनी सतीश चव्हाण यांच्या प्रचाराला टाटा बाय-बाय केल्याचे दिसत आहे.

पापड ग्रीटिंग टर्न आमदार असलेले पदवीधरांचे प्रतिनिधित्व सतीश चव्हाण हे करत आहेत. त्यांच्या कार्यकाळामध्ये त्यांनी ठळकपणे केलेली काही कामे अद्यापही पदवीधरांसमोर आलेले नाही. विशेष म्हणजे मराठवाड्यामध्ये अगदी वेगळेच राजकारण दिसत आहे. महायुतीचे उमेदवार म्हणून सतीश चव्हाण असले तरी त्यांनी मात्र मराठवाड्यातील काही भाजपने त्यांचे फोटो सुरुवातीला बॅनर वरून गायब केल्याचे दिसते. याचा रोष भाजपाच्या मतदारांमध्ये आहे तर शिवसेनेचा मराठवाड्यातील स्थानिक नेता देखील फार दूरच असल्याचे दिसत आहे. प्रामुख्याने सतीश चव्हाण यांची कारकीर्द फारसी चांगली आहे, असे म्हणतात येणार नाही. त्यातच त्यांनी मागील विधानसभा निवडणुकीमध्ये केलेले पक्षांतर, मराठवाड्यात मराठा आरक्षणासाठी सुरू असलेले आंदोलन आणि समाज म्हणून त्यांची भूमिका यात ते कधी दिसले नाही, त्यामुळे हा समाज देखील नाराज आहे. दुसरीकडे ▶▶ पान २ वर



## अग्रलेख

# सुरक्षेच्या सावलीत पारदर्शकतेचा बळी?

देशाच्या संरक्षण व्यवस्थेतील प्रत्येक व्यवहार केवळ लष्करी सिद्धतेशी नाही, तर जनतेच्या करांतून गोळा झालेल्या कोट्यवधी रुपयांच्या सुरक्षेशी जोडलेला असतो. म्हणूनच या क्षेत्रातील प्रत्येक निर्णय पारदर्शक आणि शंकेला वाव न देणारा असणे अत्यंत आवश्यक आहे. मात्र, क्षेपणास्त्रे तयार करणारी देशातील प्रमुख सरकारी कंपनी 'भारत डायनॅमिक्स लिमिटेड' (बीडीएल) आणि ५६ कोटी ८० लाख रुपयांचा खरेदी व्यवहार यावरून समोर आलेले वृत्त अत्यंत गंभीर आणि अस्वस्थ करणारे आहे. 'इंडियन एक्स्प्रेस'च्या तपासवृत्तातून बाहेर आलेली माहिती केवळ एका करारापुरती मर्यादित नसून, संरक्षण खरेदी प्रक्रियेतील पारदर्शकतेवरच मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित करते.

या संपूर्ण प्रकरणाची पार्श्वभूमी पाहिली तर अनेक अनुत्तरित प्रश्न समोर येतात. बीडीएलचे माजी अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक सिद्धार्थ मिश्रा यांनी मार्च २०२३ मध्ये पद सोडले. त्यानंतर मे २०२४ मध्ये त्यांनी आपल्या पत्नी शांभवी मिश्रा यांच्यासोबत 'ऐंद्रि डिफेन्स ॲडव्हायजरी प्रायव्हेट लिमिटेड' ही खासगी कंपनी स्थापन केली. पुढे जानेवारी २०२५ मध्ये सिद्धार्थ मिश्रा या कंपनीतून बाहेर पडले असले तरी, कंपनीची ९५ टक्के हिस्सेदारी त्यांच्या पत्नीकडेच राहिली. यानंतर अवघ्या काही महिन्यांत, म्हणजेच मे २०२६ मध्ये, याच नव्याने स्थापन झालेल्या खासगी कंपनीला बीडीएलकडून ५६.८ कोटी रुपयांची निविदा देण्यात येते. विशेष म्हणजे, ही प्रक्रिया खुली किंवा स्पर्धात्मक नव्हती; तर ती एकाच कंपनीसाठी काढण्यात आली होती. इथे मुख्य प्रश्न प्रक्रियेतील अचानक झालेल्या बदलाचा आहे. २०२४ आणि २०२५ या दोन्ही वर्षांत बीडीएलने अशाच उपकरणांसाठी सरकारी कंपन्यांना संधी दिली होती आणि संरक्षण मंत्रालयाच्या अखत्यारीतील 'इंडिया ऑप्टेल लिमिटेड'ने या निविदा जिंकल्या होत्या. मग २०२६ मध्येच ही स्पर्धात्मक प्रक्रिया बाजूला सारून एकाच खासगी कंपनीची निवड का करण्यात आली? यावर बीडीएलकडून 'तातडीची गरज' हे कारण देण्यात आले. मात्र, ही तातडी नेमकी कशामुळे निर्माण झाली? जी गरज मागील दोन वर्षांत टप्प्याटप्प्याने आणि खुल्या स्पर्धेद्वारे पूर्ण केली जात होती, ती २०२६ मध्ये अचानक एवढी तातडीची कशी झाली की स्पर्धाच नाकारावी लागली? या तातडीचा आधी अंदाज का आला नाही? निविदेच्या नोंदींमध्ये या प्रश्नांची ठोस उत्तरे नसणे, ही बाब संशय वाढवणारी आहे. दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे या कंपनीची क्षमता. आर्थिक वर्ष २०२४-२५ मधील नोंदीनुसार, या कंपनीचा वार्षिक महसूल अवघा ४४ लाख रुपये आणि नफा पावणेतीन लाख रुपयांच्या आसपास होता. कंपनीच्या ताळेबंदात स्वतःचे मोठे उत्पादन प्रकल्प किंवा मालमत्ता असल्याचे स्पष्ट दिसत नाही. अशा स्थितीत, रणगाडाविरोधी क्षेपणास्त्रांसाठी अत्यंत संवेदनशील मानले जाणारे ३०० 'ऑप्टिकल साइट्स' पुरवणे आणि पुढील १५ वर्षे त्यांची देखभाल व दुरुस्ती करणे, इतकी मोठी आणि तांत्रिकदृष्ट्या गुंतागुंतीची जबाबदारी पार पाडण्यास ही कंपनी किती सक्षम आहे? अवघ्या काही महिन्यांपूर्वी स्थापन झालेल्या कंपनीची पुरवठा साखळी आणि तांत्रिक क्षमता यांची पुरेशी पडताळणी झाली होती का, हा मुद्दा लोकहिताच्या दृष्टीने अत्यंत कळीचा ठरतो.

सरकारी खरेदी प्रक्रियेत खासगी क्षेत्राचा सहभाग असणे गैर नाही, तसेच तातडीच्या प्रसंगी विशेष अधिकार वापरणेही नियमात बसू शकते. ५६.८ कोटींचा हा प्रस्ताव म्हणजे गैरव्यवहाराचा अंतिम पुरावा नाही, हे मान्य केले तरी हितसंबंधांचा संभाव्य संघर्ष टाळण्यासाठी कोणती खबरदारी घेतली गेली, याचे उत्तर मिळणे गरजेचे आहे. माजी उच्चपदस्थ अधिकाऱ्याच्या कौटुंबिक कंपनीला अशा प्रकारे थेट कंत्राट मिळणे आणि त्याबाबत विचारलेल्या प्रश्नांवर बीडीएल किंवा संबंधित व्यक्तींनी मौन बाळगणे, यामुळे संशयाचे ढग अधिक गडद होतात. संरक्षण खरेदी ही केवळ पैशांची देवाणघेवाण नसते, तर ती सैनिकांच्या जीवाशी आणि देशाच्या सार्वभौमत्वाशी जोडलेली असते. त्यामुळे या संपूर्ण व्यवहाराची, प्रक्रियेतील बदलांची आणि कंपनीच्या निवडीची निष्पक्ष व स्वतंत्र चौकशी झालीच पाहिजे. तातडीच्या नावाखाली पारदर्शकता बाजूला ठेवली जाणार नाही आणि जनतेच्या पैशांचा प्रत्येक रुपया योग्य ठिकाणीच खर्च होईल, याची खात्री देणे सरकारचे आद्य कर्तव्य आहे.

# ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या वाढदिवसानिमित्त गोवर्धन गोशाळेत चारा वाटप

## महात्मा फुले युवा दलाचा गोसेवेचा स्तुत्य उपक्रम



**बीड । प्रतिनिधी**

**सध्याची दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन अनावश्यक खर्च टाळत महाराष्ट्र राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमाने साजरा करण्यात आला. महात्मा फुले युवा दलाच्या वतीने बीड येथील रामगड परिसरातील गोवर्धन गोशाळेत जनावरांसाठी चारा वाटप करण्यात आले. समाजसेवेबरोबरच मुक्या प्राण्यांची सेवा करणे हेही आपले कर्तव्य आहे, या भावनेतून हा उपक्रम राबविण्यात आला.**

सामाजिक बांधिलकी जपत विविध सेवाभावी उपक्रमांच्या माध्यमातून समाजातील गरजू घटकांना मदत करण्यासोबतच पशुपक्ष्यांची सेवाही केली पाहिजे, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. दुष्काळी परिस्थितीचे भान ठेवून वाढदिवसानिमित्त होणारा अनावश्यक खर्च टाळत सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून वाढदिवस साजरा करण्याचा हा स्तुत्य प्रयत्न असल्याचे यावेळी उपस्थितांनी सांगितले. या प्रसंगी महात्मा फुले युवा दलाचे संस्थापक प्रमुख एड. सतीश शिंदे ,जिल्हा परिषद सदस्य ॲड. राजेंद्र राऊत, महात्मा फुले युवा दलाचे बीड जिल्हा उपप्रमुख संजय काळे, पाटोदा तालुकाप्रमुख गणेश मोहळकर, सुलतानपूरचे सरपंच धनेश्वर खेत्रे, मयूर आखाडे, सुहास काळे, कृष्णा दुधाळ, सुधीर शिंदे, बंटी राऊत, माजी सरपंच वाघमारे साहेब आदी मान्यवर उपस्थित होते.



## जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांच्या मध्यस्थीने सर्वधर्मीय ठिय्या आंदोलन स्थगित!

गेवराई । प्रतिनिधी

शिवसेना (उ. बा. ठा.) पक्षाचे गेवराई शहरप्रमुख राजू शेख यांच्यावर तहसील कार्यालयातील कर्मचारी विलास राठोड यांनी धार्मिक व जातीवाचक टिप्पणी करून अरेरावी केली होती. या कृत्याच्या विरोधात व दोषी कर्मचाऱ्यावर तात्काळ कठोर कारवाई व्हावी यासाठी तहसीलदार यांच्या केबिनमध्ये सर्वधर्मीय ठिय्या व धरणे आंदोलन छेडण्यात आले. दरम्यान, जिल्हाप्रमुख उल्हास गिराम पाटील यांनी योग्य ती कारवाई करण्याचे आश्वासन प्रशासनाकडून घेऊन मध्यस्थी केल्यानंतर,हे आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले आहे.यावेळी प्रमुख उपस्थिती गेवराई ता.प्रमुख अजय दाभाडे, महिला आघाडीच्या मिराताई नवले, नवनाथ प्रभाळे, सतिशसिंह परदेशी, शहरप्रमुख राजू बाबूलाल शेख, छावाचे जिल्हाध्यक्ष राहुल चाळक, अनिल माने,अखिल भाई शेख, शरद ढवारे, रफिक बागवान, मुस्तफा भाई, रईस टेलर, मुजीब शहा, सादिक भाई, जलील भाई पठाण, मुनाफ मौलाना, अहमद भाई, महबूब भाई शेख, एजाज मण्यार, बाबू शेख, मुजीब शेख, राजेंद्र वेल्हाळ, दत्ताभाऊ, विठ्ठल मामा, मोहसीन शेख, अन्वर शेख, जावेद भाई यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लैंगिक समस्या कारणे, सामान्य लक्षणे आणि जीवनशैलीतील बदल-डॉ.जगदीश टेकाळे

**बीड । प्रतिनिधी**

**लैंगिक आरोग्य हे शारीरिक आणि मानसिक आरोग्याचा महत्त्वाचा भाग आहे. ताणतणाव, झोपेची कमतरता, चुकीची जीवनशैली आणि काही आरोग्य समस्यांमुळे लैंगिक अडचणी निर्माण होऊ शकतात. पुरुषांमध्ये आढळणाऱ्या सामान्य समस्या इरेक्शनमध्ये अडचण, लैंगिक इच्छा कमी होणे, लवकर वीर्यस्खलन, वीर्याची गुणवत्ता किंवा प्रमाणाबाबत चिंता लैंगिक संबंधांमध्ये आत्मविश्वास कमी होणे.**



महिलांमध्ये आढळणाऱ्या सामान्य समस्या लैंगिक इच्छा कमी होणे,योनीमध्ये कोरडेपणा, संबंधांच्या वेळी वेदना, हार्मोन्समधील बदल, मानसिक ताण व अस्वस्थता लैंगिक समस्यांची काही सामान्य कारणे- ताणतणाव, चिंता आणि मानसिक दबाव अपुरी किंवा खराब झोप लठ्ठपणा आणि शारीरिक हालचाल कमी असणे. मधुमेह किंवा इतर आरोग्य समस्या दारू, तंबाखू आणि धूम्रपान काही औषधांचे दुष्परिणाम नात्यातील तणाव किंवा संवादाचा अभाव, लैंगिक आरोग्यासाठी जीवनशैलीत हे बदल करा. संतुलित आणि पौष्टिक आहार घ्या. दररोज नियमित व्यायाम किंवा शारीरिक हालचाल करा. पुरेशी आणि चांगली झोप घ्या. ताणतणाव कमी करण्यासाठी योग, प्राणायाम किंवा ध्यान करा.ङ्ग दारू, तंबाखू आणि धूम्रपान टाळा. वजन नियंत्रणात ठेवा. जोडीदाराशी मोकळेपणाने संवाद साधा. समस्या वारंवार होत असल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्या.

आहारात काय ठेवावे? हिरव्या पालेभाज्या हंगामी फळे, सुकामेवा योग्य प्रमाणात संपूर्ण धान्य डाळी व कडधान्ये पुरेसे पाणी. काय टाळावे? जास्त तेलकट व फास्ट फूड दारू तंबाखू व धूम्रपान जास्त साखरयुक्त पेये अतिप्रक्रिया केलेले पदार्थ आजची हेल्त टिप नियमित व्यायाम, संतुलित आहार, पुरेशी झोप आणि ताणतणावावर नियंत्रण यामुळे लैंगिक आरोग्याची काळजी घेता येते. आजचा संदेश ''लैंगिक आरोग्याबद्दल बोलणे लाजेचे नाही. योग्य माहिती, योग्य सवयी आणि गरज असल्यास तज्ज्ञांचा सल्ला घेणे महत्त्वाचे आहे.'' असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी.मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात.

# महिला किसान दिनानिमित्त महिला सक्षमीकरण व प्रक्रिया उधोग विषयी महिलांना मार्गदर्शन

**माजलगाव । प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष तसेच दि १५ ऑक्टोबर राष्ट्रीय महिला किसान दिन निमित्त सुभाष साळवे प्रकल्प संचालक आत्मा तथा जिल्हाअधीक्षक कृषी अधिकारी बीड,सुरज पाटील प्रकल्प संचालक आत्मा बीड यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका कृषी अधिकारी माजलगाव यांच्या वतीने आत्मा अंतर्गत महिला सक्षमीकरण व अन्नप्रक्रिया उद्योग या विषयावर प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून श्रीमती ज्योत्स्ना मुळीक प्रशासक तथा गट विकास अधिकारी माजलगाव उपस्थित होत्या प्रमुख मार्गदर्शक म्हणून सुहास पंके विषय विशेषज्ञ



कृषी विज्ञान केंद्र डिघोळबा यांनी महिलांना शेतीवर आधारित विविध उद्योग तसेच महिलांची ओळख व शासनाच्या योजना याविषयी मार्गदर्शन केले प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित असलेल्या डॉ. सुनिता पोपळे सहा.प्राध्यापक शासकीय फूड टेक्नॉलॉजी महाविद्यालय मालेगाव यांनी विविध अन्नप्रक्रिया उद्योग मूल्यवर्धन,पॅकिंग व विक्री व्यवस्था याविषयी महिलांना मार्गदर्शन केले. रमेश कुटे यांनी महिला सक्षमीकरण आणि श्रीमती कराळे कृषी सेविका यांनी महिला शेतकरी प्रमाणपत्र याविषयी उपस्थित महिला शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले यावेळी महिला शेतकरी प्रमाणपत्राचे वितरण प्रमुख मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले कार्यक्रमाचे अध्यक्ष समारोप करताना गणेश बादाडे तालुका कृषी अधिकारी माजलगाव यांनी महिला शेतकरी प्रमाणपत्र, प्रधानमंत्रीसूक्ष्म प्रक्रिया योजना आणि कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना याविषयी महिलांना मार्गदर्शन केले कार्यक्रमाला तालुक्यातील दीडशे पेक्षा जास्त महिला तसेच कृषी विभागातील अधिकारी कर्मचारी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन गोपीनाथ पवार तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक माजलगाव यांनी केले

# लोकमान्य सार्वजनिक वाचनालयात वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा!

**आष्टी । प्रतिनिधी**

**भारताचे माजी राष्ट्रपती, थोर शास्त्रज्ञ आणि युवकांचे प्रेरणास्थान डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त आष्टी येथील लोकमान्य सार्वजनिक वाचनालयात ग्रंथप्रदर्शन व वाचक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी वाचन प्रेरणा दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले.**




याप्रसंगी आष्टी नगरपंचायतीचे उपाध्यक्ष शैलेश सहस्रबुद्धे यांनी आपल्या मनोगतातून युवकांना वाचनाचे महत्त्व पटवून देत डॉ. कलाम यांच्या विचारांचा आदर्श घेण्याचे आवाहन केले. आजच्या तरुण पिढीने डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचे प्रेरणादायी विचार आत्मसात करणे काळाची गरज आहे. समाजातील वाईट प्रवृत्तींचा त्याग करून चांगले विचार, सकारात्मक दृष्टिकोन आणि सामाजिक बांधिलकी जोपासली पाहिजे. युवकांनी व्यसनांच्या आहारी न जाता थोर व्यक्तींच्या विचारांचा आदर्श घ्यावा आणि जीवनात निश्चित ध्येय ठरवून ते साध्य करण्यासाठी प्रयत्नशील राहावे, असे आवाहन शैलेश सहस्रबुद्धे यांनी केले.वाचन प्रेरणा दिनानिमित्त आयोजित ग्रंथप्रदर्शनात विविध विषयांवरील पुस्तके मांडण्यात आली होती. या प्रदर्शनाला बालवाचकांसह वाचनप्रेमींनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. लहान वयातच मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, ज्ञानाची कक्षा रुंदावावी आणि विचारशक्ती विकसित व्हावी, या दृष्टीने अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित झाले. कार्यक्रमाला केशव सहस्रबुद्धे, कल्याणराव चव्हाण, रवी देशपांडे, राजू देशपांडे, शांतीलाल भंडारी, गणेश मुळे यांच्यासह अनेक मान्यवर, वाचक आणि बालवाचक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार ग्रंथपाल अनिल सहस्रबुद्धे यांनी मानले. वाचनातून ज्ञान, विचारांतून परिवर्तन आणि ध्येयातून यश साध्य करण्याचा संदेश देत वाचन प्रेरणा दिनाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

## पान १ वरून...

### शेतकऱ्यांची मदत अपुरी; सत्ताधारी

दिला. अजित पवार यांनी अर्थ खात्याचा कारभार शिस्तीने सांभाळला आणि आपत्तीच्या काळात शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत उपलब्ध करून दिली, असे त्यांनी नमूद केले. या विधानातून त्यांनी अजित पवार यांच्या कार्यपद्धतीचे कौतुक केले असले, तरी त्याचवेळी सध्याच्या अर्थ खात्याच्या कारभाराशी अप्रत्यक्ष तुलना केल्याची चर्चा सुरू झाली आहे. सध्या अर्थ खात्याची जबाबदारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आहे. विशेष म्हणजे, तटकरे हे सत्ताधारी महायुतीचा भाग असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या मदतीवरून त्यांनी केलेले विधान महत्त्वाचे मानले जात आहे. विरोधकांकडून सरकारच्या मदतीवर टीका होत असतानाच सत्तेत सहभागी असलेल्या घटक पक्षाच्या प्रमुख नेत्यानेही मदत वाढविण्याची मागणी केल्याने सरकारसमोरील प्रश्न अधिक ठळक झाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांची दिवाळी गोड व्हावी, या उद्देशाने त्यांच्या खात्यात पाच हजार रुपये अग्रीम मदत देण्याची घोषणा केली होती. राज्य सरकारने यंदा दुष्काळ जाहीर करण्याची प्रक्रिया लवकर सुरू केल्याचे सांगत ऑक्टोबरमध्येच दुष्काळासंदर्भातील शासन निर्णय काढण्यात आल्याचा दावा मुख्यमंत्र्यांनी केला आहे. तसेच पूरक शासन निर्णयाद्वारे १२ योजनांची अंमलबजावणी सुरू केल्याचेही त्यांनी स्पष्ट केले होते. मात्र, दुष्काळाची तीव्रता आणि शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष गरजा पाहता पाच हजार रुपयांची मदत पुरेशी आहे का, हा प्रश्न कायम आहे. दरम्यान, शेतकऱ्यांना दिली जाणारी अग्रीम मदत वाढविण्यासाठी आपण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार असल्याचे तटकरे यांनी सांगितले. त्यामुळे आता सरकार शेतकऱ्यांच्या मागणीची दखल घेऊन मदतीत वाढ करणार का, याकडे दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. सत्ताधारी पक्षातील नेत्यानेच मदत अपुरी असल्याचा मुद्दा उपस्थित केल्याने सरकारच्या पुढील निर्णयाकडे विशेष लक्ष दिले जात आहे.

------------

### राज्यातील सर्व शाळांमध्ये स्काऊट-गाईड

दिले. स्काऊट-गाईड उपक्रमासाठी शाळांमधील शिक्षकांना तालुकास्तरावर सात दिवसांचे प्रशिक्षण द्यावे. यासाठी जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांचे शुल्क आणि प्रशिक्षकांचे मानधन शालेय शिक्षण विभागामार्फत देण्यात येईल. राज्य पुरस्कारप्राप्त विद्यार्थ्यांना सध्या तीन, तर राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त विद्यार्थ्यांना दहा गुण दिले जातात. या गुणांमध्ये वाढ करण्यासाठी प्रस्ताव तयार करण्याचे निर्देश भुसे यांनी अधिकाऱ्यांना दिले.

------------

### ज्ञानेश कुमार यांच्यासह दोन्ही

मतदार यादीच्या विशेष सख४ोल पुनरावलोकन प्रक्रियेवरून (एसआयआर) राहुल गांधी यांच्यासह विरोधी पक्षांच्या नेत्यांनी सुप्रीम कोर्टात संयुक्त याचिका दाखल केली आहे. या य४ाचिकेत एकूण १३ जण याचिकाकर्ते आहेत. निवडणूक आयोगाच्या निर्णयांवर, मतदार यादीतून मोठ्या प्रमाणात नावे वगळल्याच्या मुद्द्यावर आणि मुख्य निवडणूक आयुक्तांच्या अधिकारांच्या वापरावर या याचिकेत प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. संबंधित कागदपत्रे न्यायालयात सादर करावीत आणि मतदार यादीतील अनियमिततेची स्वतंत्र चौकशी करावी, अशा मागण्याही करण्यात आल्या आहेत. या याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने निवडणूक आयोग, ज्ञानेश कुमार आणि अन्य दोन निवडणूक आयुक्तांना नोटीस बजावली. त्यांच्याकडून या प्रक्ष्ररणी उत्तर मागवण्यात आले आहे. दरम्यान, याचिकाकर्त्यांपैकी एका व्यक्तीच्या वर्तनाबाबतही न्यायालयाने स्पष्टीकरण मागितले. मात्र, नेमक्या कोणत्या याचिकाकर्त्याच्या वर्तनाबाबत न्यायालयाने आक्षेप घेतला आहे, हे स्पष्ट करण्यात आले नाही. राहुल गांधी समर्थकांसह सुप्रीम कोर्टात आल्याचा मुद्दाही सुनावणीदरम्यान उपस्थित झाला. दिल्लीतील आंदोलनादरम्यान झालेल्या कारवाईशी संबंधित याचिकांवर सुनावणी करताना सुप्रीम कोर्टाने सर्व संबंधित यंत्रणांना महत्त्वाचे निर्देश दिले. आंदोलनाच्या वेळी घडलेल्या घटनांचे सर्व सीसीटीव्ही फुटेज सुरक्षित ठेवावे आणि न्यायालयाने मागणी केल्यावर ते सादर करावे, असे निर्देश देण्यात आले. आंदोलनादरम्यान पोलिसांनी आंदोलकांना ताब्यात घेतल्याचा, काही ठिकाणी बळाचा वापर केल्याचा, मेट्रो स्थानके बंद केल्याचा आणि इंटरनेट सेवा विस्कळीत केल्याचा आरोप याचिकांमध्ये करण्यात आला आहे. एकूणच, दिल्लीतील आंदोलनादरम्यान झालेली पोलीस कारवाई, नागरिकांच्या हालचालींवरील निर्बंध आणि निवडणूक आयोगाच्या कामकाजावरून सुप्रीम कोर्टात महत्त्वाचे मुद्दे उपस्थित झाले आहेत. राहुल गांधी आणि इंडिया आघाडीच्या याचिकेवर निवडणूक आयोगाला उत्तर द्यावे लागणार असून, आंदोलनादरम्यान झालेल्या कारवाईबाबतही न्यायालयीन सुनावणी पुढे सुरू राहणार आहे.

**सरकारच्या वतीने बिनशर्त माफी**

संबंधित अधिकाऱ्यांविरोधात दाखल करण्यात आलेल्या अवमान याचिकांमध्ये सुप्रीम कोर्टाच्या आधीच्या निर्देशांचे पालन न केल्याचा आरोप करण्यात आला आहे. आंदोलकांच्या हालचालींवर मर्यादा घालणे, त्यांना ताब्यात घेणे आणि मेट्रो सेवा तसेच इंटरनेटवर निर्बंध लावणे, असे मुद्दे याचिकेत उपस्थित करण्यात आले आहेत. सुनावणीदरम्यान केंद्र सरकारच्या वतीने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सरकारने उत्तर दाखल केल्याचे सांगितले. तसेच, सरकारच्या वतीने बिनशर्त माफी मागण्यात आल्याची माहितीही त्यांनी न्यायालयाला दिली. यावर न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांनी उत्तर दाखल करण्यास झालेल्या विलंबाबाबत टिप्पणी केली.

------------

### एमपीएससी चौकशी समितीबाबत

मुंढे यांची नियुक्ती केली जाणार असल्याचे सांगण्यात आले होते. मात्र, या नियुक्तीबाबत अद्याप अधिकृत प्रक्रिया पूर्ण झालेली नसल्याचे मुंढे यांच्या वक्तव्यावरून स्पष्ट झाले आहे. अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी आज पत्रकार परिषद घेतली. यावेळी पत्रकारांनी त्यांना एमपीएससी चौकशी समितीबाबत प्रश्न विचारला. त्यावर उत्तर देताना, आपल्यासोबत या संदर्भात काही चर्चा झाली आहे; मात्र अधिकृत पत्रव्यवहार झालेला नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. 'माझ्याकडे कोणतेही अधिकृत नोटिफिकेशन आलेले नाही. याबाबत निश्चितच चर्चा झाली आहे. काही संवाद तोंडी स्वरूपात झाला आहे. मात्र, जोपर्यंत अधिकृत कम्युनिकेशन होत नाही, तोपर्यंत त्यावर बोलणे योग्य ठरणार नाही,' असे मुंढे यांनी सांगितले. तसेच, कोणासोबत चर्चा झाली, हे उघड करणे योग्य नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, एमपीएससीने जुन्या कागदपत्रांची विल्हेवाट लावून ती नष्ट करण्याचा निर्णय घेतला होता. आमदार रोहित पवार यांनी या निर्णयावर टीका केल्यानंतर आयोगाने तो निर्णय मागे घेण्याचा निर्णय घेतल्याचे समोर आले होते. या प्रकरणाबाबतही पत्रकारांनी मुंढे यांना प्रश्न विचारला. मात्र, या विषयावर भाष्य करण्यास त्यांनी नकार देत हा प्रश्न महाराष्ट्र लोकसेवा आयोगालाच विचारणे आवश्यक असल्याचे सांगितले. या प्रकरणाची आपल्याला माहिती नसून, त्याबाबत निर्णय घेण्याचा अधिकारही आपल्याकडे नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. एकीकडे एमपीएससी परीक्षांतील कथित गैरप्रकारांची चौकशी करण्याची मागणी विद्यार्थ्यांकडून केली जात असताना, दुसरीकडे चौकशी समितीच्या सचिवपदाबाबत अद्याप अधिकृत आदेश जारी झालेला नसल्याचे मुंढे यांच्या वक्तव्यावरून समोर आले आहे. त्यामुळे या समितीच्या नियुक्तीबाबत आणि चौकशीच्या पुढील प्रक्रियेबाबत अधिकृत घोषणेकडे लक्ष लागले आहे.

-----------------

### ठाकरे सेनेचा दसरा मेळावा

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही अर्ज केला होता. तर शिवसेना उबाठा पक्षानेही अर्ज केल्यानंतर हा वाद न्यायालयात गेला होता. त्यानंतर शिवाजी पार्कवर मेळावा घेण्याची परवानगी उबाठा पक्षाला मिळाली होती. त्यानंतर वांद्रे-कुर्ला संकुल येथे शिवसेनेचा मेळावा होऊ लागला. शिंदेंच्या शिवसेनेने गेल्या वर्षी दसरा मेळावा बीकेसी मैदानावर घेतला, तर शिवसेना उबाठा पक्षाचा दसरा मेळावा शिवाजी पार्कमध्येच झाला. यंदाही उबाठा पक्षाला काही अटींसह परवानगी देण्यात आली आहे. रात्री १० वाजेपर्यंत सभा घेण्यात यावी. मैदानाचे नुकसान किंवा अटींचे उल्लंघन झाल्यास २० हजार रुपयांची अनामत रक्कम जमा करणे. ५०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर नोंदणीकृत हमीपत्र सादर करणे. मैदानाबाहेर आवाज जाणार नाही याची दक्षता घेण्याचे तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडाळाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार माती मैदानात टाकता येणार नाही, अशा अटी घातल्या आहेत. दरम्यान, मागील काही महिन्यांपासून ठाकरे बंधूंनी एकत्रितपणे अनेक ठिकाणी हजेरी लावलेली असताना आता दसरा मेळाव्याच्या निमित्ताने शिवाजी पार्कमध्ये उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र येण्याची शक्यता आहे.

------------

### एसटी कर्मचाऱ्यांचा ६

वेतन, ६० टक्के महागाई भत्ता व थकबाकी, सातव्या वेतन आयोगानुसार वेतन करार, दिवाळीसाठी १५ हजार रुपये बोनस आणि कॅशलेस वैद्यकीय सुविधा देण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच निवृत्त कर्मचाऱ्यांची थकीत देणी, कोरोना काळातील उर्वरित पगार देणे आणि २०१९ मधील पात्र उमेदवारांना सेवेत सामावून घेण्याची मागणीही करण्यात आली आहे. दरम्यान, भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी एसटी कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांवरून परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्यावर प्रश्न उपस्थित केले आहेत. राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना महागाई भत्ता लागू झाल्यानंतर एसटी कर्मचाऱ्यांनाही तो देण्याचे ठरले होते; मात्र तीन महिने उलटूनही भत्ता मिळाला नसल्याचा आरोप त्यांनी केला. आता शासन या मागण्यांवर काय निर्णय घेते, याकडे कर्मचाऱ्यांसह एसटी प्रवाशांचे लक्ष लागले आहे. संप झाल्यास राज्यातील सार्वजनिक वाहतुकीवर परिणाम होण्याची शक्यता आहे.

------------

### नैऋत्य मान्सून संपूर्ण देशातून

नोंद झाली आहे. हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार, ईशान्य मान्सूनच्या आगमनानंतर २१ ऑक्टोबरपर्यंत दक्षिण द्वीपकल्पीय भारतातील अनेक भागांत पावसाळी वातावरण राहील आणि काही ठिकाणी मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. भारतात दोन प्रमुख मान्सून प्रणाली सक्रिय असतात: जून ते सप्टेंबर दरम्यानचा 'नैऋत्य मान्सून' आणि ऑक्टोबर ते डिसेंबर दरम्यानचा 'ईशान्य मान्सून' (परतीचा मान्सून). नैऋत्य मान्सून भारताच्या कृषी क्षेत्रासाठी आणि अर्थव्यवस्थेसाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो, कारण त्याचा थेट परिणाम खरीप हंगामातील पिकांवर होतो. ईशान्य मान्सूनची तीव्रता कमी असली, तरी तो रब्बी पिकांच्या उत्पादनासाठी, विशेषतः दक्षिण राज्यांमध्ये, महत्त्वाची भूमिका बजावतो. माहितीनुसार, यंदाच्या नैऋत्य मान्सून हंगामात एकूण ७५९.४ मिमी पावसाची नोंद झाली, जी ८६८.६ मिमीच्या सरासरीपेक्षा १२.६ टक्के कमी आहे.

------------

### सतीश भाऊंच्या प्रचाराला मित्र

स्व. अजितदादा हयात नाहीत याची सहानुभूती मिळेल अशी धारणा असली तरी ती मात्र सफल होणार नसल्याचे सध्याच्या परिस्थितीवरून दिसते. गतवेळी त्यांच्या प्रचाराची धुरा सांभाळणारे अनेकजण आता त्यांच्यावरच नाराज असल्याचे बोलले जात आहे. मराठवाड्यामध्ये शिवसेनेचे म्हणजेच एकनाथ शिंदे यांचे पदाधिकारी मोठ्या प्रमाणात आहेत, मात्र त्यांनीही हात आखडता घेतल्याचे दिसते. शिवसेना आणि भाजप हे महायुतीतील प्रमुख असताना, ते मात्र सतीश चव्हाण यांच्या प्रचारापासून का दूर आहेत हा चिंतनाचा विषय आहे. त्यांनीच टाटा बाय-बाय केला असल्याची चर्चा देखील आता मतदारांमध्ये रंगत आहे. स्वर्गीय गोपीनाथ मुंडे, पंकजा मुंडे यांना मानणारा मोठा वर्ग आहे, मात्र त्यांचे फोटो प्रचाराच्या बॅनर वरून गायब झाल्याने हे सर्व शिक्षित मतदार चव्हाण यांना भेटतीलच का ही शंका आहे. त्यात राष्ट्रवादीचे प्रमुख नेते प्रचारात आघाडीत आहेत मात्र इतर नाराज राष्ट्रवादी व सहकारी पक्ष यांनीच टाटा बाय-बाय केल्याचे दिसत आहे.

-----------

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शुक्रवार दि. १६ ऑक्टोबर २०२६



## थोडक्यात



### सत्कार दैवताचा... सन्मान विद्यार्थ्यांचा!

नाशिक – समता परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा ओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेते, राज्याचे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री मा. ना. छगनरावजी भुजबळ साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचा सत्कार करून साहेबांच्या आवाहनाप्रमाणे विद्यार्थ्यांसाठी वह्यां भेट करताना समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य ड. सुभाष राऊत, रंजित पाटील, समता परिषदेचे बीड जिल्हाध्यक्ष निखिल शिंदे, बीड शहराध्यक्ष नितीन राऊत, माळी महासंघाचे जिल्हाध्यक्ष धनंजय काळे, मंगेश जमदाडे आदी दिसत आहेत.

### श्रीधर फडके यांच्या सुमधुर 'गीत रामायण' गायनाने रंगत

**अंबाजोगाईत योगेश्वरी देवी नवरात्र महोत्सवात रसिक मंत्रमुग्ध**

अंबाजोगाई । प्रतिनिधी

श्रद्धास्थान शक्तीपीठ असलेल्या योगेश्वरी देवीच्या शारदीय नवरात्र महोत्सवा निमित्त महाराष्ट्रातील प्रख्यात गायक श्रीधर फडके यांनी प्रभू श्रीरामांच्या जीवनातील विविध प्रसंग, त्यांचे आदर्श जीवनचरित्र, त्याग, कर्तव्यनिष्ठा, बंधुप्रेम आणि लोककल्याणाचा संदेश देणाऱ्या अजरामर 'गीत रामायण' या संगीतकृतीचे गायन बुधवार १४ आक्टोंबर रोजी केले. अजरामर गीत रामायणातील भावस्पर्शी गीतांचे सादरीकरण प्रसिद्ध गायक व संगीतकार पं.श्रीधर फडके यांनी आपल्या सुमधुर स्वरांतून केले. त्यांच्या सुरेल गायनाने कार्यक्रमाला विशेष रंगत आली



गीत रामायण ही केवळ गीतांची मालिका नसून ती प्रभू श्रीरामांच्या जीवनातील आदर्श मूल्यांचा परिचय करून देणारी एक समृद्ध सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरा आहे. गीतकार ग. दि. माडगूळकर यांच्या प्रतिभावान लेखणीतून साकारलेल्या आणि ज्येष्ठ संगीतकार सुधीर फडके यांच्या अविस्मरणीय संगीताने अजरामर झालेल्या या गीत रामायणाने अनेक पिढ्यांच्या मनावर अधिराज्य गाजवले आहे. आजही या गीतांमधील शब्द, स्वर आणि भावार्थ रसिकांच्या मनाला स्पर्श करतात.

पं. श्रीधर फडके यांनी गीत रामायणातील गीतांचे सादरीकरण करताना मूळ रचनांचा भावार्थ, त्यातील काव्यसौंदर्य आणि संगीताची माधुरी यांचा सुरेख मिलाफ साधला. त्यांच्या आवाजातील भावपूर्णता, सुरेलपणा आणि सादरीकरणातील सहजता यामुळे गीतांमधील प्रसंग जणू श्रोत्यांच्या डोळ्यांसमोर उभे राहिले. प्रभू श्रीरामांचे आदर्श व्यक्तिमत्त्व, सीतामातेची निष्ठा, लक्ष्मणाचा त्याग, भरताची बंधुभक्ती आणि हनुमंताची प्रभू रामचंद्रांवरील असीम श्रद्धा अशा विविध भावछटांचा अनुभव रसिकांना या सादरीकरणातून मिळाला.उपस्थित रसिक श्रोते भक्तिरसात तल्लीन झाले.

# आंतरराज्य टोळीतील दोघांना बेड्या

## परळी येथील कापड दुकानातील चोरीचा गुन्हा उघड:एलसीबीला यश

बीड / परळी वैजनाथ । प्रतिनिधी

परळी वैजनाथ शहरातील गांधी मार्केट परिसरातील एका रेडिमेड कपड्याच्या दुकानाचे शटर उचकटून रोख रक्कम लंपास करणाऱ्या आंतरराज्य टोळीचा बीड स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पर्दाफाश केला आहे. या कारवाईत टोळीतील दोन आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून त्यांच्याकडून ७१ हजार ४०० रुपयांची रोकड जप्त करण्यात आली आहे. या गुन्ह्यात सहभागी असलेल्या अन्य दोन साथीदारांचा शोध पोलीस घेत आहेत.

दिनांक १० सप्टेंबर २०२६ रोजी रात्री २:०० ते २:३० वाजेच्या सुमारास परळी येथील गांधी मार्केटमधील 'अजय कलेक्शन' या दुकानाचे शटर उचकटून अज्ञात चोरट्यांनी गल्ल्यातील अंदाजे ५ लाख १० हजार रुपयांची रोकड चोरून नेली होती. याप्रकरणी परळी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक २१८/२०२६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन स्थानिक गुन्हे शाखेचे पथक समांतर तपास करत होते. घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी आणि गोपनीय बातमीदारांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे १४ ऑक्टोबर रोजी पाटोदा येथे छापा टाकून पथकाने



अकबर लुकमान खान याला ताब्यात घेतले. त्याच्यासोबत असलेल्या अन्य एका संशयितास ताब्यात घेऊन कसून चौकशी केली असता, त्यांनी या चोरीची कबुली दिली.

पोलिसांनी या प्रकरणात अकबर लुकमान खान (वय ३२, रा. पिंप्राळा हुडको, जळगाव) आणि परवेज मेहमूद सय्यद (वय २२, रा. भोसले आखाडा, अहिल्यानगर) या दोघांना अटक केली असून त्यांच्याकडून ७१ हजार ४०० रुपये हस्तगत केले आहेत. तर त्यांचे साथीदार मोईन बादशाह शेख (रा. मुकुंदनगर, अहिल्यानगर) व अशपाक सबीर खान (रा. लोहारा, ता. पाचोरा, जि. जळगाव) हे दोघे फरार असून पोलीस त्यांचा कसून शोध घेत आहेत.

तपासादरम्यान ही टोळी आंतरराज्य पातळीवर सक्रिय असल्याचे समोर आले आहे. आरोपींचा राजस्थानमधील अजमेर येथील गंज पोलीस ठाणे आणि आदर्शनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील चोरीच्या गुन्ह्यांशी थेट संबंध निष्पन्न झाला आहे. त्यांच्याकडून आणखी काही मोठे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे, पोलीस अंमलदार रामचंद्र केकान, मारोती कांबळे, विष्णु सानप, गोविंद भताने, विकास राठोड, सचिन आंधळे, विकी सुरवसे तसेच चालक अतुल हराळे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

## माहूरच्या देवीचे ठाण असलेली मनूरची रेणुकामाता भक्तांचे श्रद्धास्थान

**नवसाला पावणारी देवी म्हणून ओळख; नवरात्रोत्सवात भाविकांची दर्शनासाठी गर्दी**

ज्योतिराम पांढरपोटे/माजलगाव : बीड जिल्ह्यातील माजलगाव तालुक्यातील मनूर येथे माहूरच्या देवीचे ठाण असलेली रेणुकामातेचे प्राचीन मंदिर डोंगरमाथ्यावर वसलेले आहे. नवसाला पावणारी देवी म्हणून रेणुकामातेची परिसरात विशेष ओळख असून, अनेक भाविकांचे हे श्रद्धास्थान बनले आहे. नवरात्रोत्सवाच्या काळात या मंदिरात धार्मिक वातावरण निर्माण होत असून, भाविकांची दर्शनासाठी लगबग पाहायला मिळते.नवरात्रोत्सव हा देवीच्या उपासनेचा महत्त्वाचा सण मानला जातो. या काळात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.नवरात्रात महीला भावीक या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर धार्मिक कार्यक्रम आणि देवीची आराधना करण्यावर अनेकांनी भर देत असतात.



**नवसपूर्तीसाठी अनवाणी पायाने चालण्याची प्रथा**

आजच्या आधुनिक आणि डिजिटल युगातही मनूर येथील रेणुकामातेवरील भाविकांची श्रद्धा कायम आहे. विशेषतः तरुण-तरुणी देवीच्या दर्शनासाठी अनवाणी पायाने येत असल्याचे दिसून येते. नवरात्रोत्सवाच्या काळात नवसपूर्तीसाठी अनेक भाविक अनवाणी पायाने मंदिरात येतात. काही भाविक चप्पल-बूट न घालता देवीच्या दर्शनासाठी येण्याची परंपरा जपतात. ही प्रथा येथील धार्मिक श्रद्धेचे प्रतीक मानली जाते.

**दहा दिवस धार्मिक कार्यक्रमांची परंपरा**

नवरात्रोत्सवाच्या दहा दिवसांत अनेक भाविक आपल्या घरी धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करतात. देवीची पूजा, आरती आणि विविध धार्मिक विधी करून भक्तिभावाने नवरात्र साजरे केले जाते. मंदिर परिसरातही नवरात्रोत्सवासाठी तयारी केली जाते. भाविकांच्या श्रद्धेमुळे मनूर येथील रेणुकामाता मंदिराला परिसरात विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

**श्रद्धा आणि भक्तीचे अनोखे नाते**

मनूर येथील रेणुकामाता मंदिर हे केवळ धार्मिक स्थळ नसून, परिसरातील भाविकांच्या श्रद्धेचे केंद्र आहे. नवसाला पावणारी देवी अशी ख्याती असल्याने विविध गावांतील भाविक येथे दर्शनासाठी येतात. नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने देवीच्या भक्तीचा जागर होत असून, परंपरा आणि श्रद्धेचा वारसा आजही जपला जात आहे.

## पान ६ वरुन...

### शिक्षण विभागातील

कार्यभार अन्य कर्मचाऱ्यांकडे देण्याचा आदेश शिक्षणाधिकारी यांनी काढला होता. सदरील कार्यभार हस्तांतरित केला नाही. तसेच एका मयत शिक्षकाचे वैद्यकीय प्रतिपूर्ती देवळाच्या आदेशात गंभीर हलगर्जीपणा व निष्काळजीपणा केला. त्रुटी असलेल्या संचिका परत केल्या नाही. तसेच वरिष्ठांच्या आदेशाचे पालन न करता कर्तव्यात कसूर केल्या प्रकरणी श्रीमती डोईफोडे यांना निलंबित करण्यात आले आहे. निलंबनाच्या कालावधीत त्यांना केज मुख्यालय देण्यात आले आहे.

### माजलगाव येथे दुकान

अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

घटनेचे गांभीर्य ओळखून वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तपासाबाबत महत्त्वपूर्ण सूचना दिल्या होत्या. पोलिसांनी तांत्रिक बाबींचे सखोल विश्लेषण केले असता सदर गुन्हा परभणी येथील शाहरुख ऊर्फ शाकेर हमीद शेख याने केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर पोलिसांनी संभाजीनगर पोलीस ठाणे (जि. बीड) येथील एका गुन्ह्यातून त्याला वर्ग (हस्तांतरित) करून ११ ऑक्टोबर २०२६ रोजी अटक केली. पोलीस कोठडीदरम्यान आरोपीकडून सुपर मोबाईल शॉपीतून चोरीस गेलेले विविध कंपन्यांचे १ लाख ७२ हजार रुपयांचे २० मोबाईल हस्तगत करण्यात आले असून, या प्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत. ही धडक कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, उपविभागीय पोलीस अधिकारी अशोक अनंत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक धनंजय ढोणे, सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवाजी पवार, सपोनि कल्याण नेहरकर, पोलीस उपनिरीक्षक संदीप राठोड, पोलीस हवालदार पाखरे (ब.नं. २१२), पोलीस कॉन्स्टेबल महेश चव्हाण (ब.नं. १९२६) आणि महादेव बहिरवाळ (ब.नं. २१७२) यांनी केली आहे. शहर पोलिसांच्या या कामगिरीचे नागरिकांमधून कौतुक होत आहे.

### आष्टी पोलीस ठाण्यात शासकीय

आहे. त्यांना सध्या न्यायालयीन कोठडी (एम.सी.आर.) मिळाली असून, प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे. कायद्याचे रक्षकच लक्ष्य; कर्तव्य बजावताना कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर! पोलीस ठाण्यासारख्या कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या ठिकाणीच कर्तव्यावर असलेल्या कर्मचाऱ्यांशी कथित मारहाण, विनयभंगाचा प्रयत्न आणि शिवीगाळ झाल्याचा प्रकार गंभीर मानला जात आहे. शासकीय कामात अडथळा निर्माण करणाऱ्या अशा घटनांमुळे पोलीस कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न उपस्थित होतो. या प्रकरणात तपासातून नेमके काय निष्पन्न होते आणि न्यायालयात आरोप कसे सिद्ध होतात, याकडे आता लक्ष लागले आहे.

### पात्रुड-जीवनपूर रस्त्याच्या

बंद करण्यात आले आहे. सदर काम अर्धवट अवस्थेत बंद असल्याने लोणगाव ते जीवनपूरपर्यंतचा रस्ता धोकादायक स्थितीत आहे. याबाबत आज माजलगाव उपविभागाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता यांना युवा वर्गाच्या वतीने निवेदन देण्यात आले. या निवेदनाद्वारे अंतिम इशारा व विनंती करण्यात आली आहे की, लोणगाव ते जीवनपूरपर्यंतच्या उर्वरित साईड पट्ट्या भरण्याचे काम तात्काळ सुरू करून पूर्ण करण्यात यावे. जर दि. १७/१०/२०२६ पर्यंत सदर काम सुरू करण्यात आले नाही, तर दि. १८/१०/२०२६ रोजी सकाळी ९:०० वाजता लोणगाव चौक येथे समस्त ग्रामस्थ, विद्यार्थी व युवा वर्गाच्या वतीने तीव्र रस्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असा इशारा या निवेदनातून देण्यात आला आहे.

### दुष्काळ आणि नापिकीला

कमी पाऊस झाल्यामुळे माळरानावरील सर्व पिके जळून गेली आणि त्यांचे आर्थिक गणित कोलमडले. आर्थिक अडचणींमुळे त्यांनी आत्महत्या केली असल्यांचे गावकऱ्यांचे म्हणणे आहे.अंकुश रंगनाथ गंगणे यांच्या पश्चात पत्नी आणि दोन मुलांचा संसार उघड्यावर पडला आहे. घटनेची माहिती मिळताच कुटुंबीय आणि ग्रामस्थांनी तात्काळ पोलीस पाटील व तलाठी यांना कळबले. याबाबत अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्यात नोंद घेण्यात आली असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

### माजलगाव महाराष्ट्र ग्रामीण

व इतर मागण्यांसाठी दि १५ ऑक्टोबर गुरुवार रोजी धरणे आंदोलन शेतकऱ्यांकडून करण्यात आले या मागण्यावर शाखा व्यवस्थापक श्री.विकास भाटकर यांनी गांभीर्याने विचार करत खातेदारांच्या हिताचा तोडगा काढू असे आश्वासन देऊन लेखी पत्र संघटनेकडे देण्यात आले या धरणे आंदोलनामध्ये माकप तालुका सचिव कॉ.शिवाजी कुरे,किसानसभेचे तालुका सचिव कॉ.कृष्णा सोळंके,कॉ.विठ्ठल सक्राते,बहुसंख्येने मोठेवाडी येथील शेतकरी उपस्थित होते यामध्ये किसान सभेचे कॉम्रेड सुदर्शन हिवरकर, कॉ.भगवान पवार सुभाष सरजे,विद्यासागर वरपे,नाथाराव किन्होळकर,प्रकाश इके,विठ्ठल डांगे,राजाराम पाष्टे,बालाजी रेडे,नितीन जाधव,विकास घोडके,अशोक तपसे,वैजनाथ किन्होळकर व बहुसंख्य शेतकरी खातेदार शेतकरी यावेळी उपस्थित होते,

## माजलगाव तालुक्यात दुर्गामाता दौडला मोठ्या उत्साहात सुरुवात

माजलगाव । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील माजलगाव तालुक्यात नवरात्र महोत्सवाच्या पावन पर्वावर दुर्गामाता दौडला मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात सुरुवात झाली आहे. नऊ दिवस चालणाऱ्या या दौडमध्ये मोठ्या संख्येने शिवभक्त, धारकरी, वारकरी आणि तरुण-तरुणी सहभागी झाले आहेत.



या दौड दरम्यान दररोज देवीचा जागर, नामस्मरण आणि भक्तिगीते म्हणून हिंदू संस्कृतीचा जागर केला जात आहे. देव, देश आणि धर्मासाठी काम करणारी ही तरुण पिढी आपली हिंदू संस्कृती व धार्मिक परंपरा जपण्यासाठी धडपड करत असल्याचे चित्र दिसत आहे. या दुर्गामाता दौडची सांगता विजयादशमीच्या (दसरा) दिवशी होणार आहे. आयोजक तरुणांनी माजलगाव तालुक्यातील सर्व खेड्यापाड्यातील तरुणांना, महिलांना आणि भाविकांना आवाहन केले आहे की, विजयादशमीच्या दिवशी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या धार्मिक कार्यात सहभागी व्हावे.

छत्रपती शिवाजी महाराज आणि धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या विचारांनी प्रेरित होऊन ही नवीन पिढी आपली हिंदू संस्कृती जपण्याचा प्रयत्न करत आहे. त्यामुळे या तरुण पोरांचे कौतुक करावे तेवढे कमीच आहे, अशी भावना सर्वत्र व्यक्त होत आहे.

## नवरात्रीनिमित्त जागर प्रतिष्ठानचा स्तुत्य उपक्रम

माजलगाव । प्रतिनिधी

शारदीय नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून जागर प्रतिष्ठानच्या वतीने मुलींच्या आरोग्याविषयी जनजागृती करण्यासोबतच ३०० मुलींना मोफत सॅनिटरी पॅडचे वाटप करण्यात आले. शाहू माध्यमिक विद्यालय, पात्रुड येथे हा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला.

जागर प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष किसन पाटील चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम आयोजित करण्यात आला. किशोरवयीन मुलींमध्ये मासिक पाळीविषयी जागरूकता निर्माण करणे, मासिक पाळीच्या काळात स्वच्छता राखण्याचे महत्त्व पटवून देणे तसेच मुलींनी आपल्या आरोग्याबाबत सजग राहावे, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता.



मासिक पाळी हा महिलांच्या जीवनातील नैसर्गिक भाग असून, त्याविषयी समाजात असलेले गैरसमज दूर होणे आवश्यक आहे. विशेषतः शालेय वयातील मुलींना योग्य आरोग्यविषयक माहिती मिळणे, त्यांना स्वच्छतेच्या साधनांची उपलब्धता करून देणे आणि त्यांच्या आरोग्याच्या प्रश्नांकडे संवेदनशीलतेने पाहणे गरजेचे आहे. याच सामाजिक बांधिलकीतून जागर प्रतिष्ठानच्या माध्यमातून हा उपक्रम राबविण्यात आला.

सामाजिक कार्यासोबतच आरोग्य जनजागृतीला प्राधान्य देत जागर प्रतिष्ठान विविध उपक्रम राबवत असून, मुलींच्या आरोग्याची काळजी घेणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे, या भावनेतून हा उपक्रम पार पडला.जागर प्रतिष्ठानच्या या उपक्रमामुळे ३०० मुलींना सॅनिटरी पॅड उपलब्ध झाले असून, मुलींच्या आरोग्याबाबत जनजागृती करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे.





### सनपेस स्कूलमध्ये २०० विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील गंगामसला येथील सनपेस स्कूलमध्ये शुभांगी शिवकुमार माने हिच्या वाढदिवसानिमित्त गुरुवार, दि. १५ ऑक्टोबर रोजी इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतच्या सुमारे २०० विद्यार्थ्यांना वह्या व पेन या शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला प्रोत्साहन मिळावे आणि शिक्षणासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध व्हावे, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. वाढदिवसाच्या निमित्ताने अनावश्यक खर्च टाळून विद्यार्थ्यांना शालेय साहित्य देण्याचा हा उपक्रम कौतुकास्पद ठरला.

या कार्यक्रमाला सरपंच शिवकुमार माने, बाळासाहेब खराडे, सचिन सोळंके,पत्रकार राजाभाऊ पास्टे, अशोक रासवे, रंजीत जोगडे, पशुपती गुळविले, सचिन माने, बाळासाहेब माने, प्राचार्य सबीस, गणेश सोळंके, सम्राट डोंगरे यांच्यासह शाळेतील शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविणाऱ्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले. अशा सामाजिक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळण्यास मदत होते.

## दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्कमाफीचा दिलासा - नाजीम शेख

**दहावी-बारावीसह महाविद्यालयीन परीक्षांसाठी सवलतीचे निर्देश;शुल्क भरले असल्यास परतावा मिळण्याची शक्यता**

आष्टी । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना दिलासा देण्यासाठी परीक्षा शुल्कमाफीचा निर्णय महत्त्वपूर्ण ठरणार आहे. दुष्काळामुळे आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या शेतकरी कुटुंबांतील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी शासनाकडून परीक्षा शुल्कात सवलत देण्याची तरतूद करण्यात आली आहे. राज्यातील जवळपास सर्वचं जिल्ह्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून सरकारने नुकतीच दुष्काळग्रस्त जिल्ह्याची यादी जाहीर केली आहे. यादीमध्ये बीड जिल्ह्यातील सर्व तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे. यामुळे आष्टी तालुक्यांतील विद्यार्थ्यांना देखील परीक्षा शुल्कमाफीचा लाभ मिळणार आहे.



शासनाच्या परीक्षाशुल्क माफिच्या निर्णयामुळे दुष्काळग्रस्त भागातील शेतकरी कुटुंबांतील दहावी,बारावी आणि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना परीक्षेच्या काळात आर्थिक अडचणींमुळे अतिरिक्त ताण सहन करावा लागू नये हा या सवलती मागचा महत्त्वाचा उद्देश आहे. आष्टी तालुक्यात शैक्षणिक संस्थांचे व्यापक जाळे असल्यामुळे विद्यार्थ्यांची संख्या देखील मोठ्या प्रमाणावर आहे. पुढील वर्षी फेब्रुवारी-मार्चमध्ये होणाऱ्या दहावी आणि बारावीच्या परीक्षांसाठी दुष्काळग्रस्त तालुक्यांतील विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्कमाफी देण्याचे निर्देश असल्याची माहिती आहे. त्यामुळे संबंधित विद्यार्थ्यांनी आपल्या शाळा, कनिष्ठ महाविद्यालय किंवा परीक्षा विभागाकडे संपर्क साधून शुल्कमाफी संदर्भातील अधिकृत सूचना आणि आवश्यक कागदपत्रांची माहिती घ्यावी.

**आधी शुल्क भरले असल्यास परताव्याची तरतूद**

परीक्षेचे शुल्क यापूर्वीच भरलेल्या विद्यार्थ्यांनाही या निर्णयाचा लाभ मिळू शकतो. उपलब्ध माहितीनुसार, पात्र विद्यार्थ्यांकडून आधी वसूल केलेले परीक्षा शुल्क परत करण्याबाबतही निर्देश देण्यात आले आहेत. मात्र, परतावा कसा मिळणार, त्यासाठी अर्ज करावा लागणार का आणि कोणती कागदपत्रे आवश्यक असतील, याबाबत संबंधित विभागाच्या अधिकृत सूचनांची खात्री करणे आवश्यक आहे.

**महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनाही लाभ मिळण्याची शक्यता**

दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांबरोबरच उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अखत्यारीतील पात्र महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनाही परीक्षा शुल्कमाफीचा लाभ मिळू शकतो. तथापि, हा लाभ कोणत्या अभ्यासक्रमांना, विद्यापीठांना आणि परीक्षा प्रकारांना लागू आहे हे संबंधित शासन निर्णय व विभागीय निर्देशांवर अवलंबून राहील.

**विद्यार्थ्यांनी काय करावे**

दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांनी आपल्या शाळा-महाविद्यालयाकडे परीक्षा शुल्कमाफीबाबत चौकशी करावी. शुल्कमाफीसाठी स्वतंत्र अर्ज आवश्यक आहे का आणि भरलेल्या शुल्काचा परतावा मिळविण्यासाठी कोणती प्रक्रिया आहे, याची माहिती घ्यावी.

cmyk

# साखर दरवाढीसाठी आठ दिवसांची मुदत; अन्यथा आंदोलन सुरूच!

## साखरेचा किमान विक्री दर ५५ रुपये करण्याची मागणी; केंद्राकडे शिष्टमंडळ नेण्याचे सहकारमंत्र्यांचे आश्वासन

मुंबई / प्रतिनिधी

साखरेचा किमान विक्री दर प्रतिकिलो ५५ रुपये करावा, इथेनॉलला प्रतिलिटर ७५ रुपये दर द्यावा, साखरेचे दर द्विस्तरीय करावेत आणि एफआरपी वेळेत न देणाऱ्या साखर कारखान्यांवर कठोर कारवाई करावी, या प्रमुख मागण्यांसाठी आक्रमक झालेल्या शेतकरी संघटनांनी सरकारला आठ दिवसांची मुदत दिली आहे. सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी दिलेली आश्वासने या कालावधीत पूर्ण न झाल्यास शेतकऱ्यांना न्याय मिळेपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्याचा इशारा संघटनांनी दिला आहे.

शरद जोशी विचार मंचच्या नेतृत्वाखाली विविध शेतकरी संघटनांच्या प्रतिनिधींची सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांच्या दालनात बैठक झाली. या बैठकीत साखरेचे दर, ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मिळणारी एफआरपी, इथेनॉलचे दर, साखर आयात आणि साखर कारखान्यांच्या कारभारासंदर्भातील प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. राज्य सरकारच्या अखत्यारीतील प्रश्न सोडविण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत बैठक आयोजित केली जाईल, तर केंद्र सरकारशी संबंधित मागण्यांसाठी शिष्टमंडळ नेण्यात येईल, असे आश्वासन सहकारमंत्र्यांनी दिले. बैठकीत शिवसेना (शिंदे गट) प्रणित शेतकरी आघाडीचे डॉ. जालिंदर पाटील यांनी साखर आयातीचा मुद्दा उपस्थित करत सरकारच्या धोरणावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. सरकार आयात साखरेसाठी प्रतिकिलो ६७ रुपये





खर्च करत असेल, तर देशांतर्गत साखरेला प्रतिकिलो ५५ रुपये दर देण्यास अडचण काय, असा सवाल त्यांनी केला. साखरेच्या कमी विक्री दराचा फटका साखर कारखान्यांच्या आर्थिक गणिताला आणि पर्यायाने ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या हिताला बसत असल्याची भूमिका संघटनांनी मांडली.

साखरेचा किमान विक्री दर वाढविणे, इथेनॉलला योग्य दर मिळवून देणे आणि साखरेच्या दरांमध्ये द्विस्तरीय व्यवस्था लागू करणे, या मागण्यांवर सरकारने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी या वेळी करण्यात आली. त्याचबरोबर ऊस उत्पादकांना रास्त व किफायतशीर दर (एफआरपी) वेळेत न देणाऱ्या कारखान्यांवर कारवाई करण्याची मागणीही संघटनांनी लावून धरली. सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी राज्यातील दुष्काळी परिस्थितीकडे लक्ष वेधले. पाण्याची उपलब्धता कमी झाल्याने ऊस वाळत असून, साखर कारखाने सुरू करण्यास विलंब झाल्यास शेतकऱ्यांचे नुकसान होऊ शकते, असे त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे साखर कारखान्यांचा हंगाम सुरळीत सुरू राहणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. साखर आयात आणि साखरेची किमान विक्री किंमत यांसारखे विषय केंद्र सरकारच्या अखत्यारीत येत असल्याने त्यावर केंद्राशी चर्चा करावी लागेल. यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच दोन्ही उपमुख्यमंत्र्यांशी चर्चा करून केंद्र सरकारकडे मागण्या मांडण्यासाठी शेतकरी संघटनांच्या प्रतिनिधींचे शिष्टमंडळ नेण्यात येईल, असे आश्वासन पाटील यांनी दिले.

### आठ दिवसांनंतर आंदोलनाची पुढील दिशा

सहकारमंत्र्यांच्या आश्वासनानंतर शरद जोशी विचार मंच आणि विविध शेतकरी संघटनांनी सरकारला आठ दिवसांची मुदत दिली आहे. या कालावधीत मागण्यांबाबत ठोस निर्णय झाला नाही, तर आंदोलन मागे घेतले जाणार नाही, असा इशारा डॉ. जालिंदर पाटील यांनी बैठकीनंतर दिला. केवळ आश्वासनांवर समाधान न मानता साखर आणि ऊस दरासंदर्भातील प्रश्न प्रत्यक्ष मार्गी लागणे आवश्यक असल्याची भूमिका संघटनांनी घेतली आहे.

राज्य सरकारच्या अधिकारातील प्रश्न सोडविण्यासाठीही प्राधान्याने प्रयत्न केले जातील, असे त्यांनी स्पष्ट केले. या बैठकीला शेतकरी संघटना, शिवसेना शेतकरी सेना, स्वाभिमानी संभाजी ब्रिगेड, आम आदमी पक्ष, बळीराजा संघटना, जय शिवराय किसान संघटना, रयत क्रांती आणि भाजपप्रणित शेतकरी संघटनेचे प्रतिनिधी उपस्थित होते. साखर आयुक्त संजय कोलते, माजी आमदार सदाभाऊ खोत, वैभव कांबळे, सावकार मादनाईक, रुपेश पाटील यांच्यासह विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी चर्चेत सहभाग घेतला. आता आठ दिवसांच्या मुदतीत सरकार साखर आणि ऊस दराच्या प्रश्नांवर कोणते ठोस निर्णय घेते, याकडे ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

# पीककर्जाचा दोन वर्षांचा थकीत व्याज परतावा द्या

## स्वतंत्र भारत पक्षाची मुख्यमंत्र्यांकडे मागणी



मुंबई / प्रतिनिधी

पंजाबराव देशमुख पीककर्ज व्याज परतावा योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना मिळणारा तीन टक्के व्याज परतावा दोन वर्षांपासून थकीत आहे. २०२३-२४, २०२४-२५ या आर्थिक वर्षांतील परताव्याची रक्कम अद्याप शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा झाली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजी असून, थकीत रक्कम तातडीने जमा करण्याची मागणी स्वतंत्र भारत पक्षाचे जिल्हाध्यक्ष सुनील फराटे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे, की पीक कर्जाची परतफेड जूनअखेर झाल्यानंतर सोसायटचांकडून ऑक्टोबर-नोव्हेंबरपर्यंत प्रस्ताव सादर केले जातात. शासनाकडून प्रस्तावांची छाननी करून पात्र शेतकऱ्यांना तीन टक्के व्याज परतावा दिला जातो. मात्र, मागील दोन वर्षांचा परतावा रखडल्याने आर्थिक फटका सहन करावा लागत आहे. शासनाने या प्रकरणात तातडीने लक्ष घालून थकीत रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग करण्याचे आदेश द्यावेत.

केंद्र शासनाच्या पीककर्ज व्याज परतावा योजनेतील १२ महिन्यांची परतफेडीची अट आडसाल व पूर्वहंगामी ऊस उत्पादकांसाठी अडचणीची ठरत आहे. या ऊस पिकांचा कालावधी १८ महिन्यांचा असल्याने कारखान्याकडून ऊसबिल मिळाल्यानंतर शेतकरी कर्जाची परतफेड करतात. परिणामी, केंद्राच्या तीन टक्के व्याज परताव्यापासून हे शेतकरी वंचित राहत असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

# भुईमूग पिवळा पडण्याची समस्या व उपाययोजना

भुईमूग पिकात पिवळेपणा दिसू लागल्यास तो अनेक कारणांमुळे होऊ शकतो. विशेषतः जर पाऊस सतत होत असेल आणि जमीन चुनखडी (कॅल्सियमयुक्त) असेल, तर पिकाच्या आरोग्यावर त्याचा थेट परिणाम होतो.

समस्या ओळख :पाने पिवळी होणे: ही लक्षणे प्रामुख्याने सूक्ष्म अन्नद्रव्यांच्या कमतरतेमुळे (विशेषतः लोह, मॅग्नेशियम, मोलिब्डेनम दिसून येतात.

पाऊस आणि चुनखडी जमिन :सततच्या पावसामुळे मुळांना ऑक्सिजन मिळत नाही. चुनखडी जमिनीत किजास्त असल्याने लोह व इतर सूक्ष्म अन्नद्रव्ये शोषली जात नाहीत. मुळांच्या कार्यक्षमतेवर परिणाम होतो.

उपाययोजना :सूक्ष्म अन्नद्रव्ये फवारणी: पाने पिवळी पडल्यास खालील मिश्रणाचा फवारणीद्वारे उपयोग करा: स्प्रे मिश्रण: फेरस सल्फेट - ०.५% (५०० ग्रॅम/१०० लिटर पाणी). सायट्रिक ॲसिड - ५० ग्रॅम/१०० लिटर पाणी. युरिया - १% (१ किलो/१०० लिटर पाणी) (वाढीला चालना देण्यासाठी) हे मिश्रण ७-१० दिवसांच्या अंतराने २ वेळा फवारावे.

पाणी निचरा सुधारणा :सततचा पाऊस असल्यामुळे जमिनीत पाणी साचत असल्यास, पिकामध्ये पाणी साचणार नाही याची दक्षता घ्या. नाली पद्धतीने पाणी वाहून नेण्याची सोय करावी.



जमिनीचा कि नियंत्रित करणे :जमिनीचा कि७.५ पेक्षा जास्त असल्यास सूक्ष्म अन्नद्रव्ये शोषले जात नाहीत. अशावेळी सेंद्रिय घटक (जसे कंपोस्ट, गांडूळ खत) टाकल्यास जमिनीचा कि काही प्रमाणात संतुलित होतो. झिंक, फेरस आणि मॅग्नेशियमसारखी सूक्ष्म अन्नद्रव्ये पाने फवारणीने द्यावीत.

जमिनीची तपासणी :एकदा मृदा परीक्षण करून घ्या. त्यामुळे नेमकी कोणती अन्नद्रव्ये कमी आहेत हे समजेल.

जैविक उपाय : रायझोबियम व पीएसबी कल्चर यांचे बीजप्रक्रिया केल्यास मुळांच्या आरोग्यावर चांगला परिणाम होतो. ट्रायकोडर्मा + जीवामृत/जिवाणू खते वापरल्यास मुळांची वाढ सुधारते. भुईमूग पिकात पिवळेपणा दिसल्यास तो केवळ अन्नद्रव्यांच्या कमतरतेचा नाही, तर जमिनीचा प्रकार, हवामान व पाण्याचा निचरा या सर्व गोष्टींचा मिळून परिणाम असतो. योग्य अन्नद्रव्य फवारणी, निचरा व जैविक उपाययोजना करून आपण भुईमूग पीक निरोगी ठेवू शकतो.

# हिवाळ्याच्या चार महिन्यांत जनावरांची काळजी आणि चारा नियोजन

हिवाळ्याच्या काळात दुभत्या जनावरांची काळजी घेण्याबाबत निष्काळजीपणा केल्यामुळे गाई, म्हशीसारखे प्राणी कमी दूध देऊ लागतात. हिवाळ्याच्या चार महिन्यांत दुभत्या जनावरांच्या चारा व देखभाल व्यवस्थेकडे विशेष लक्ष द्यावे. पशुपालकांनी जनावरांच्या आहाराचे व देखभालीचे योग्य व्यवस्थापन केले तर त्यांची जनावरे अधिक दूध देतात. हिवाळ्याच्या चार महिन्यांत दुभत्या जनावरांना कोणता चारा द्यावा आणि त्यांच्या देखभालीमध्ये कोणती काळजी घ्यावी याकडे लक्ष दिले पाहिजे.

हा चारा खायला द्यावा : पशु तज्ज्ञांच्या मते दुधाळ जनावरांना नेहमी ऋतुमानानुसार चारा द्यावा. विशेषतः हिवाळ्यात, सामान्य दिवसांपेक्षा जास्त डोस द्यावा. भारतात नोव्हेंबरपासून थंडीचे दिवस सुरू होतात आणि फेब्रुवारीपर्यंत थंडी कायम राहते. या दिवसात ज्या जनावरांना असा चारा द्यावा ज्याची पचनक्षमता ६० टक्क्यांपेक्षा जास्त आहे. नोव्हेंबर आणि डिसेंबरमध्ये दुभत्या जनावरांना ज्वारी, गवार, नेपियर, सुदान, भुसा हा चारा द्यावा. तर जानेवारी आणि फेब्रुवारीमध्ये बरसीम, ल्युसर्न, ओट मेथी, भुसा आणि सायलेज हा चारा देणे योग्य मानले जाते. याशिवाय इतर पौष्टिक घटकही द्यावेत.

आहार देताना पुढील गोष्टी लक्षात ठेवा : जनावरांना दररोज ठराविक वेळी चारा द्यावा.



दिवसातून दोनदा आहार द्यावा. जनावरांना फक्त ८ ते १० तासांच्या अंतराने चारा द्यावा. त्यामुळे त्यांची पचनक्रिया व्यवस्थित राहते. जनावरांना नेहमी चाऱ्यासोबत धान्य द्यावे. त्यामुळे दूध उत्पादनात घट होत नाही. दूध काढल्यानंतर जनावरांना हिरवा चारा व धान्य द्यावे. हे त्यांच्या आरोग्यासाठी चांगले राहील. दुभत्या जनावरांची पचनक्रिया नेहमी निरोगी राहावी यासाठी जनावरांना नेहमी पाण्यात भिजवलेला पेंढा खायला द्यावा. कोरडा व हिरवा चारा नेहमी कुट्टी तयार करून जनावरांना द्यावा. त्यामुळे चाऱ्याची नासाडी कमी होते. तसेच जनावरांना चारा खाण्यात फारसा त्रास होत नाही. दुधाळ जनावरांना फक्त हिरवा चारा देऊ नये. त्यापेक्षा गव्हाचा कोंडा किंवा पेंढा मिसळून द्या, कारण हिरव्या चाऱ्यात ९० टक्के पाणी असते. हिरवा चारा जास्त प्रमाणात दिल्यास जनावरांच्या शरीराचे तापमान कमी होते.

पशुखाद्यात 'या' पौष्टिक घटकांचा समावेश करा : दुग्धजन्य प्राण्यांपासून अधिक दूध उत्पादन मिळविण्यासाठी त्यांना नेहमी पौष्टिक आहार दिला पाहिजे. जनावरांना चाऱ्याच्या व्यतिरिक्त पोषक तत्वे, खनिज मिश्रण आणि मीठ दररोज द्यावे. जनावरांना फक्त धान्य देणे टाळावे. त्यामुळे जनावरांच्या पचनशक्तीवर विपरीत परिणाम होऊन दूध उत्पादनात घट होण्याची शक्यता आहे. तसेच दूध काढल्यानंतर धान्य व चारा दोन्ही द्यावे.

गोठ्याचे व्यवस्थापन : हिवाळ्याच्या काळात गोठ्यात किंवा गुरांच्या देखभालीची विशेष काळजी घ्यावी, कारण थोड्याशा निष्काळजीपणामुळे मोठे नुकसान होते. साधारणपणे हिवाळ्याच्या चार महिन्यांत थंड वाऱ्यांमुळे वातावरणात थंडी वाढते. गायींच्या तुलनेत म्हशींना थंडीच्या वातावरणात अधिक समस्यांना सामोरे जावे लागते. पारा घसरल्याने प्राण्यांना शरीराचे तापमान राखण्यासाठी भरपूर ऊर्जा खर्च करावी लागते. निष्काळजीपणामुळे जनावरांना सर्दी, खोकला, सर्दी, न्यूमोनिया आदी आजार होऊ शकतात. गाई-म्हशींना दिवसा उन्हात बांधावे. संध्याकाळ होताच थेट थंड अंगावर येणार नाही अशा ठिकाणी बांधावे. तसेच जनावरांच्या गोठ्यातील फरशी नेहमी कोरडी ठेवावी. जर फरशी ओली असेल तर शेण गोळा केल्यानंतर त्यात कोरडी राख टाकून मूत्र वाळवावे. जनावरांचे शेड पूर्णपणे बंद ठेवू नये. त्यामध्ये पुरेशा प्रकाशाची तरतूद असावी. जनावरांच्या आरामासाठी जनावरांच्या शेडमध्ये जाड पेंढा पसरावा. प्राण्याला आठवड्यातून एकदा तरी आंघोळ घालावी.

# दिन विशेष

## महत्वाच्या घटना

१६२० : 'मेफ्लॉवर' जहाजाने साउदॅम्पटन बंदरातुन उत्तर अमेरिकेकडे प्रयाण केले.
१८२१ : मैक्सिकोच्या स्वातंत्रतेला मान्यता देण्यात आली होती.
१८६१ : ब्रिटन देशांतील पोस्ट ऑफिस मध्ये बचत खाता उघडण्यास सुरुवात झाली.
१९०८ : 'जनरल मोटर्स कॉर्पोरेशन' या कंपनीची स्थापना झाली.
१९३५ : इंडियन कंपनीज ॲक्ट अन्वये 'बँक ऑफ महाराष्ट्र'ची नोंदणी करण्यात आली.
१९४५ : दुसरे महायुद्ध हाँगकाँगमधील जपानी सैन्याने रॉयल नेव्हीसमोर शरणागती पत्करली
१९६३ : झेरॉक्स ९१४ या प्रतिमुद्रक यंत्राचे पहिले प्रात्यक्षिक.
१९६७ : सोव्हियत संघाने पूर्व कजाख मध्ये आण्विक चाचणी केली.
१९७५ : पापुआ न्यू गिनी या देशाला (ऑस्ट्रेलियापासुन) स्वातंत्र्य मिळाले.
१९८७ : ओझोनच्या थराच्या कमीत कमी संरक्षण करण्यासाठी मॉन्ट्रियल प्रोटोकॉलवर स्वाक्षरी केली आहे.
१९९७ : आय. टी. सी. आंतरराष्ट्रीय मैदानी स्पर्धेत राजीव बालकृष्णन याने शंभर मीटर धावण्याच्या शर्यतीत १०.५० सेकंद वेळ नोंदवून राष्ट्रीय विक्रम केला.
१९९७ : संस्कृत भाषेसंदर्भात प्रशंसनीय कार्य केल्याबद्दल मुंबई येथील मराठा मंदिर संस्थेच्या वरळी हायस्कूलमधील संस्कृतचे निवृत्त शिक्षक पं. गुलाम दस्तगीर अब्बासअली बिराजदार यांना 'राष्ट्रीय संस्कृत पंडित' हा राष्ट्रपतींकडून दिला जाणारा पुरस्कार जाहीर
२००८ : भारतीय हेवी इलेक्ट्रिकल्स लिमिटेड (भेल) च्या कर्मचाऱ्यांना विश्वकर्मा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

## जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१३८० : चार्ल्स (सहावा) फ्रान्सचा राजा (मृत्यू: २१ आक्टोबर १४२२)
१३८६ : हेन्री (पाचवा) इंग्लंडचा राजा (मृत्यू: ३१ ऑगस्ट १४२२)
१८५३ : नोबेल पारितोषिक विजेते जर्मन डॉक्टर आल्ब्रेख्त कॉसेल यांचा जन्म.
१८८८ : बेंटले मोटर्स लिमिटेड चे डब्ल्यू ओ. बेंटले यांचा जन्म. (मृत्यू: १३ ऑगस्ट १९७१)
१९०७ : वामनराव सडोलीकर भारतीय हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताच्या जयपूर-अत्रोली घराण्यातील प्रसिद्ध शास्त्रीय गायक (मृत्यू: २५ मार्च १९९१)
१९१३ : कमलाबाई कृष्णाजी ओगले 'रुचिरा' या पाकशास्त्रावरील प्रचंड खपाच्या पुस्तकाच्या लेखिका (मृत्यू: २० एप्रिल १९९९)
१९१६ : एम. एस. सुब्बुलक्ष्मी भारतरत्न, पद्मभूषण, पद्म विभूषण पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय शास्त्रीय कर्नाटकी गायक (मृत्यू: ११ डिसेंबर २००४)
१९२३ : सिंगापूरचे पहिले पंतप्रधान ली कुआन यी यांचा जन्म. (मृत्यू: २३ मार्च २०१५)
१९२५ : आयर्लंडचे पंतप्रधान चार्ल्स हॉगे यांचा जन्म.
१९३१ : भारतीय क्रिकेट पंच आर. रामचंद्र राव यांचा जन्मदिन.
१९४२ : नामदेव धोंडो तथा 'ना. धों' महानोर निसर्ग कवी व प्रयोगशील शेतकरी, त्यांना 'पानझड' या कवितासंग्रहासाठी साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला आहे. १९ व्या मराठवाडा साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. त्यांना पद्मश्री पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.
१९५४ : संजय बंदोपाध्याय भारतातील बंगाली हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतातील प्रख्यात सितार वादक
१९५६ : डेव्हिड कॉपरफिल्ड अमेरिकन जादूगार
१९७१ : भारतीय हिंदी चित्रपट सृष्टीतील प्रसिद्ध गीतकार, पटकथा लेखक व कवी प्रसून जोशी यांचा जन्मदिन.

## मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६८१ : मुघल शासक दारा शिकोह आणि सम्राट औरंगजेब यांची मोठी बहीण जहाँनारा बेग़म यांचे निधन.
१७३६ : डॅनियल फॅरनहाइट जर्मन शास्त्रज्ञ (जन्म: २४ मे १६८६)
१८२४ : लुई (अठरावा) फ्रान्सचा राजा (जन्म: १७ नोव्हेंबर १७५५)
१९३२ : सर रोनाल्ड रॉस हिवतापाच्या जंतुंचा शोध लावल्याबद्दल नोबेल पारितोषिक मिळवणारे (१९०२) ब्रिटिश डॉक्टर (जन्म: १३ मे १८५७ आल्मोडा, उत्तराखंड)
१९४४ : भारतीय अभियंता व काशी हिंदू महाविद्यालयाचे माजी उप कुलगुरू ज्वालाप्रसाद यांचे निधन.
१९६५ : फ्रेड क्विम्बी अमेरिकन ॲनिमेशनपट निर्माते (जन्म: ३१ जुलै १८८६)
१९६५ : परमवीर चक्र पुरस्कार विजेता भारतीय सैन्य अधिकारी लेफ्टनंट कर्नल ए.बी. तारापोर यांचे निधन.
१९७३ : पुण्यातील जुन्या पिढीतील सरदार, पर्वती संस्थानचे विश्वस्त, संगीतज्ञ, इतिहासाचे अभ्यासक गंगाधरराव नारायणराव तथा आबासाहेब मुजुमदार यांचे निधन. त्यांचे मूळ नाव श्रीधर पांडुरंग प्रभुणे होते. मुजुमदारांकडे ते दत्तक गेले. पुण्याच्या भारत इतिहास संशोधक मंडळाचे ते चोवीस वर्षे चिटणीस होते.
१९७७ : केसरबाई केरकर साहित्य नाटक अकादमी पुरस्कार सन्मानित जयपूर-अतरौली घराण्याच्या भारतीय शास्त्रीय गायिका (जन्म: १३ जुलै १८९२)
१९८४ : बिकीनि चे निर्माते लुई रायर्ड यांचे निधन. (जन्म: १६ सप्टेंबर १९८४)
१९९४ : जयवंत दळवी साहित्यिक, नाटककार व पत्रकार. कथा, कादंबरी, नाटक, प्रवासवर्णन, विनोदी लेख असे विविध प्रकार त्यांनी हाताळले. ते 'ठणठणपाळ' या टोपणनावाने विनोदी व मार्मिक लेखन करीत. (जन्म: १४ ऑगस्ट १९२५)
२००५ : लेसर चे शोधक गॉर्डन गूल्ड यांचे निधन. (जन्म: १७ जुलै १९२०)
२०१२ : आयमॅक्स चे सहसंस्थापक रोमन कोरियटर यांचे निधन. (जन्म: १२ डिसेंबर १९२६)
२०१७ : पद्मविभूषण पुरस्कार सन्मानित भारतीय वायुदलाचे वरिष्ठ अधिकारी मार्शल अर्जन सिंह यांचे निधन.



राज्य लोकतंत्र

मराठवाडा वृत्तांत

शुक्रवार दि.१६ ऑक्टोबर २०२६ ५



# जिल्ह्यात गाव दत्तक अभियान; टंचाईग्रस्त गावांना मिळणार दिलासा-जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

जालना। प्रतिनिधी

जिल्ह्यातील दुष्काळ परिस्थिती, वाढते तापमान, आटलेले जलाशय आणि करपलेली पिके अशा दुष्काळी संकटाच्या छायेत असलेल्या जालना जिल्ह्यातील टंचाईग्रस्त गावांना दुष्काळाच्या झळांमधून बाहेर काढून दिलासा देण्यासाठी 'गाव दत्तक अभियान' च्या माध्यमातून सर्वोतोपरी मदत करण्याचा प्रयत्न करणार असल्याचे जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी सांगितले. जिल्हाधिकारी कार्यालयातील प्रगती सभागृहात जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या संकल्पनेतून लोकसहभागाला प्राधान्य देत सामाजिक दायित्वाचा नवा आदर्श निर्माण करणारा 'गाव दत्तक अभियान' या अभिनव उपक्रमाच्या बैठकीत श्रीमती मित्तल बोलत होत्या. यावेळी जिपचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्ण कांत कनवारीया, अप्पर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, उपजिल्हाधिकारी मनिषा दांडगे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील यांच्यासह जिल्ह्यातील उद्योजक, व्यापारी महासंघ, सामाजिक संस्था, विविध संघटनातील मान्यवर उपस्थित होते.

यावेळी श्रीमती मित्तल म्हणाल्या की,



लोकसहभागाच्या माध्यमातून सामाजिक दायित्वाची भावना कृतीत उतरवून समाजहिताचा नवा आदर्श निर्माण करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त आणि अतिसंवेदनशील गावांमधील नागरिकांना मदत मिळवून देण्यासाठी तसेच मदत करू इच्छिणाऱ्या व्यक्ती, उद्योजक, स्वयंसेवी संस्था आणि सामाजिक संस्थांना गरजूंशी थेट जोडण्यासाठी त्रिस्तरीय सूत्रावर आधारित हे अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानात जिल्हा प्रशासन मुख्य सुविधादाता म्हणून काम करणार असून, हेल्पलाइन, संस्थांचा सहभाग आणि नागरिकांचे योगदान या तीन प्रमुख स्तंभांवर अभियानाची अंमलबजावणी केली जाणार आहे. अभियानाच्या पहिल्या टप्प्यात जिल्ह्यातील सर्व आठ ही तालुक्यांसाठी स्वतंत्र हेल्पलाइन क्रमांक जाहीर करण्यात आले आहेत. या हेल्पलाइनच्या माध्यमातून मदतीची गरज असलेल्या नागरिकांची तसेच मदत करण्यास इच्छुक व्यक्ती व संस्थांची नोंदणी केली जाणार आहे. पाणी, जनावरांसाठी चारा, रोजगार, शैक्षणिक मदत, आरोग्यसेवा आणि कर्ज यांसारख्या गरजांसाठी नागरिकांना मदत मागता येईल. त्याचबरोबर आर्थिक मदत, आवश्यक साहित्य किंवा कुटुंब व गाव दत्तक घेण्याची इच्छा असलेल्यांनाही या यंत्रणेद्वारे सहभागी होता येणार आहे. यामुळे गरजूंना योग्य मदतदारांशी जोडण्याची प्रक्रिया सुलभ होणार असल्याचे श्रीमती मित्तल यांनी सांगितले. या अभियान अंतर्गत जिल्ह्यातील अतिसंवेदनशील गावांना विविध उद्योजक, कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व (सीएसआर) निधी आणि स्वयंसेवी संस्थां, विविध संघटनाच्या माध्यमातून दत्तक देण्याचे नियोजन आहे. या गावांमध्ये सर्वप्रथम जलव्यवस्थापनाच्या कामांना प्राधान्य दिले जाणार आहे. त्यानंतर गावातील प्रत्यक्ष गरजांची नोंद असलेल्या नोंदवहीनुसार शालेय साहित्य किट, आरोग्य किट, जनावरांसाठी चारा बँक आदी उपक्रम राबविण्यात येतील. गावांच्या गरजांनुसार नियोजनबद्ध मदत उपलब्ध करून देणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

या अभियानाचे वैशिष्ट्य म्हणजे समाजातील प्रत्येक घटकाला मदतीत सहभागी होण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. 'विश्वासाचे कर्ज' या संकल्पनेतून 'रंग दे' या आरबीआय-नियंत्रित पीअर-टू-पीअर मंचाद्वारे शेतकरी आणि महिला बचत गटांना थेट आर्थिक मदत करण्याचा पर्याय उपलब्ध करून देण्यात आल्याची माहिती श्रीमती मित्तल यांनी दिली. याशिवाय, दुष्काळग्रस्त गावातील कुटुंबाचा येणाऱ्या नऊ महिन्यांच्या कालावधीत सांभाळ करण्यासाठी 'कुटुंब दत्तक' हा उपक्रम जिल्ह्यात राबविण्यात येणार आहे. स्थानिक अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यासाठी गावातील शेतकरी आणि महिला बचत गटांनी तयार केलेल्या उत्पादनांच्या खरेदीला प्राधान्य देण्याचे आवाहनही या अभियानातून करण्यात येणार आहे. तसेच गरजू नागरिक आणि मदत करण्यास इच्छुक घटक यांच्यात थेट समन्वय निर्माण करणे, गावांच्या मूलभूत गरजांना प्राधान्य देणे आणि समाजातील विविध घटकांचा सहभाग वाढविणे, हा या त्रिस्तरीय अभियानाचा मुख्य हेतू आहे. प्रशासनाच्या समन्वयातून उद्योग, सामाजिक संस्था आणि सामान्य नागरिक एकत्र आल्यास दुष्काळग्रस्त गावांना दिलासा मिळण्यास मदत होऊ शकते. 'जालना साथ देईल' या संकल्पनेतून सामूहिक सहभागाच्या बळावर जिल्ह्यातील गावांच्या गरजा पूर्ण करण्याचा जिल्हा प्रशासनामार्फत प्रयत्न केला जाणार असल्याचे ही श्रीमती मित्तल यावेळी म्हणाल्या.दुष्काळग्रस्त भागातील नागरिकांच्या हाताला काम मिळावे आणि त्यांच्या उपजीविकेला आधार मिळावा, यासाठी प्रशासनाकडून 'व्हिबी-जी रामजी' योजनेअंतर्गत दररोज प्रत्येक व्यक्तीला रोजगार उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या माध्यमातून गरजू कुटुंबांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देतानाच त्यांच्या आर्थिक अडचणी कमी करण्यावर भर दिला जाणार आहे. जलव्यवस्थापन, गावांच्या मूलभूत गरजांची पूर्तता आणि रोजगारनिर्मिती यांची सांगड घालून दुष्काळग्रस्त गावांना दिलासा देण्याचा प्रशासनाचा प्रयत्न आहे. तसेच जिल्ह्यात जलसंधारण आणि भूजलपातळी वाढविण्याच्या उद्देशाने 'व्हिबी-जी रामजी' योजनेअंतर्गत प्रत्येक गावात २०० जलतारा (शोषखड्डे) तयार करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. पावसाचे पाणी जमिनीत मुरवून भूजल पुनर्भरणाला चालना देणे, पाण्याची उपलब्धता वाढविणे आणि भविष्यातील पाणीटंचाईची तीव्रता कमी करणे, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे दुष्काळग्रस्त गावांमध्ये जलव्यवस्थापनाला प्राधान्य देत रोजगारनिर्मिती आणि जलसंधारणाची कामे एकत्रितपणे राबविण्यावर प्रशासनाचा भर राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. 'गावाने आपल्याला नेहमीच समृद्ध केले आहे. आता दुष्काळाच्या या कठीण प्रसंगात गावाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची आपली नैतिक जबाबदारी आहे. प्रत्येक नागरिकाने आणि उद्योगाने यात मनापासून योगदान द्यावे.' असे ही आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले.

## शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारासाठी १५ नोव्हेंबरपर्यंत ऑनलाईन अर्जांचे आवाहन

बीड। प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागामार्फत क्रीडा क्षेत्रातील अत्यंत प्रतिष्ठेचा मानला जाणारा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार सन २०२४-२५ आणि सन २०२५-२६ या वर्षांसाठी जाहीर करण्यात आला आहे. या पुरस्कारासाठी राज्यातील उत्कृष्ट क्रीडापटू आणि क्रीडा मार्गदर्शकांकडून दि. १५ नोव्हेंबर २०२६ पर्यंत ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात आले आहेत, अशी माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांनी दिली आहे.

क्रीडा क्षेत्रात विशेष उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ज्येष्ठ क्रीडा महर्षींसाठी जीवन गौरव पुरस्कार देण्यात येणार आहे. क्रीडा प्रशिक्षक आणि महिला क्रीडा मार्गदर्शकांसाठी उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक / जिजामाता राज्य क्रीडा पुरस्कार देण्यात येणार आहे. सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या खेळाडूंसाठी शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (खेळाडू) देण्यात येणार आहे. विशेष सक्षमीकरण दाखवणाऱ्या दिव्यांग खेळाडूंसाठी दिव्यांग खेळाडू पुरस्कार देण्यात येणार आहे. साहसी क्षेत्रात धाडसी कामगिरी करणाऱ्या व्यक्तींसाठी साहसी उपक्रम पुरस्कार देण्यात येणार आहे. क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना प्रोत्साहन देण्यासाठी दरवर्षी हे पुरस्कार दिले जातात. शासन निर्णय २९ डिसेंबर २०२३ आणि २५ जानेवारी २०२४ नुसार लागू करण्यात आलेल्या सुधारित नियमावली २०२३ च्या आधारे ही निवड प्रक्रिया राबवली जाणार आहे. या पुरस्कारांसाठी अर्ज करण्याची प्रक्रिया दि. १२ ऑक्टोबर २०२६ पासून सुरू झाली असून, इच्छुकांना दि.१५ नोव्हेंबर २०२६ रोजीपर्यंत आपले अर्ज सादर करता येणार आहेत. तरी इच्छुक खेळाडू, दिव्यांग खेळाडू, क्रीडा मार्गदर्शक आणि साहसी वीर यांनी क्रीडा विभागाच्या अधिकृत :https://sports.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर जाऊन विहीत मुदतीत केवळ ऑनलाईन पद्धतीनेच अर्ज सादर करावेत. मुदतीनंतर येणाऱ्या कोणत्याही अर्जाचा विचार केला जाणार नाही, असे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

## शाळेत गैरहजर राहणाऱ्या विद्यार्थीनींवर लक्ष ठेवा

### बालविवाहाला आळा घालण्यासाठी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची सुचना

बीड। प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातून बालविवाहाची अनिष्ट प्रथा समूळ नष्ट करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने आता पूर्णपणे कंबर कसली आहे. मुलींच्या गळतीचे प्रमाण आणि त्यातून होणारे बालविवाह रोखण्यासाठीबीड जिल्हा प्रशासनाने शिक्षण विभागाला अतिशय कठोर आणि विशेष सूचना दिल्या आहेत. बालविवाहाला आळा घालण्यासाठी ज्या शाळकरी मुली शाळेत सलग १५ दिवसांपेक्षा जास्त काळ सतत गैरहजर आहेत, अशा मुलींवर विशेष लक्ष ठेवण्याचे आणि या प्रकरणांचा सखोल तपास करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी शिक्षण विभागाला दिले आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत जिल्हास्तरीय संनियंत्रण समिती, बालकल्याण समिती आणि चाईल्ड हेल्पलाईनच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी पोलिस उपअधिक्षक राजु नवले, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी फारुख शेख, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी सुदाम निर्मळ, पंचायत व शिक्षण विभागासह बाल कल्याण समितीचे सदस्य यांची प्रमुख उपस्थिती होती.

महिलांचे संरक्षण, त्यांच्यावरील कौटुंबिक हिंसाचार रोखणे आणि बालविकास योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा



प्रशासनाने आता कडक पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. बालविवाह निर्मूलनाच्या कार्यात हयगय आणि निष्काळजीपणा केल्याप्रकरणी गेवराई व धारूर तालुक्याच्या संबंधित गटविकास अधिकाऱ्यांना जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. बैठकीदरम्यान बालविवाह झाल्याची माहिती मिळताच जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी तत्परतेने संबंधित यंत्रणेशी भ्रमणध्वनीवरून थेट संपर्क साधला. बालविवाह झाल्याचे समजताच तात्काळ कायदेशीर कारवाई करण्याचे कडक निर्देश त्यांनी जागेवरच प्रशासनाला दिले. बालविवाह रोखण्याच्या कामात कोणतीही हयगय खपवून घेतली जाणार नाही, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला.महिलांच्या संरक्षणासाठी हुंडा निर्मूलन, कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण, देवदासी प्रथा निर्मूलन आणि अनैतिक व्यापार प्रतिबंध यांसारख्या सामाजिक कायद्यांची जिल्ह्यात कशी अंमलबजावणी सुरू आहे, याचा आढावा या बैठकीत घेण्यात आला. तसेच जिल्ह्यातील बालगृहांची एकूण संख्या जाणून घेत, तेथील व्यवस्थेबाबत जिल्हाधिकारी श्री.जॉन्सन यांनी आवश्यक ते निर्देश दिले. चाईल्ड हेल्पलाईन आणि बालकल्याण समितीने अधिक सक्रियपणे काम करावे, अशी अपेक्षाही त्यांनी यावेळी व्यक्त केली. तसेच जिल्हाधिकारी श्री.जॉन्सन यांनी विविध सामाजिक कायदे आणि महिला धोरणांच्या अंमलबजावणीची कडक तपासणी केली.

## रेशीम कोष बाजारपेठेत रेशीम कोषाला ८२० रुपये भाव

जालना

कृषी उत्पन्न बाजार समिती, जालना च्या रेशीम कोष बाजारपेठेत रेशीम कोषाला प्रती किलो ८२०/- रुपये मिळाल्याने रेशीम उत्पादक शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झालेले आहे. रेशीम कोषाला मिळालेला दर हा समाधानकारक दर रेशीम उत्पादक शेतकऱ्यांसाठी उत्साहवर्धक ठरत असून जालना जिल्ह्यातील रेशीम उद्योगाच्या वाढीसाठी हि महत्वपूर्ण बाब मानली जात आहे.

कृषी उत्पन्न बाजार समिती, जालना व जिल्हा रेशीम कार्यालय, जालना यांच्या माध्यमातून रेशीम उत्पादक शेतकऱ्यांना आपल्या उत्पादित रेशीम कोष विक्री करण्यासाठी बाजारपेठ उपलब्ध करण्यात आलेली आहे. रेशीम कोष बाजारपेठत खरेदीदारांची उपस्थिती आणि रेशीम कोषाच्या खरेदी विक्री प्रक्रियेमध्ये शेतकऱ्यांना त्यांच्या रेशीम कोष उत्पादनास योग्य दर मिळण्यास मदत होत आहे. रेशीम कोषाला प्रति किलो ८२०/- रुपये दर मिळाल्याने रेशीम शेतीकडे वळणाऱ्या शेतकऱ्यांसाठी सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे.

आज रोजी रेशीम कोष विक्री करणारे शेतकरी श्री. मदन रंगनाथ बरकुले, रा. खांडवी ता. परतूर यांनी उत्पादित केलेल्या रेशीम कोषाला प्रति किलो ८२०/- व श्री. गोविंद रंगनाथ बरकुले, रा. खांडवी ता. परतूर यांनी उत्पादित केलेल्या रेशीम कोषाला प्रति किलो ८१५/-रुपये असा दर मिळाला.

सदर रेशीम कोषाची खरेदी दिशा सिल्क, जालना यांनी केली आहे. या रेशीम कोष खरेदी-विक्री व्यवहारामुळे शेतकऱ्यांना बाजारपेठेतील स्पर्धात्मक दराचा लाभ मिळत आहे. रेशीम शेती हा शेतकऱ्यांना पूरक उत्पन्न देणारा महत्वाचा कृषी पूरक व्यवसाय आहे. योग्य मार्गदर्शन, दर्जेदार उत्पादन बाजारपेठेची उपलब्धता आणि खरेदीदारांचा सहभाग यामुळे रेशीम शेतीला चालना मिळत आहे. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समिती चे प्रशासक श्री. परमेश्वर वरखडे, रेशीम विकास अधिकारी कु. निर्मला उगले, श्री. परेश बेरा, सहायक निबंधक सहकारी संस्था, बदनापूर, श्री. प्रणव वाघमारे, सहायक निबंधक सहकारी संस्था, जालना, श्री. भरत तनपुरे सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती, जालना श्री. भरत जायभाये, अमोल सोनटक्के, गजानन जहऱ्हाड, किशोर गोल्डे व इतर कर्मचारी उपस्थिती होती

**जाहीर प्रगटन**

**मा. श्री एम. ए. शिंदे, दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड यांच्या न्यायालयात.**

**किरकोळ दिवाणी अर्ज ४१३/२०२६**

**मार्फत ॲड. व्ही. एन. मस्के**

**कौशल्याबाई व इतर विरुध्द निरंक**

अर्जदार :- १. कौशल्याबाई भ्र. त्रिंबक मिसाळ, वय ७७ वर्षे, धंदा घरकाम, २. मनिषा भ्र. नवनाथ मिसाळ, वय ३६ वर्षे, धंदा घरकाम,२ अ) चैत्राली पि. नवनाथ मिसाळ, वय १६ वर्षे, धंदा शिक्षण,२ ब) चैतंन्य पि. नवनाथ मिसाळ, वय १३ वर्षे, धंदा शिक्षण, अर्जदार क. २ अ) व २ ब) यांची अ.पा.क. आई अर्जदार क्र. २, अर्जदार क. १, २ व २ ब) रा. डागाचीवाडी ता. पाटोदा जि. बीड. अर्जदार क. २ अ) रा. ३१ अ/०७, एस.आर.पी.एफ. ग्रुप बी गोरेगाव (इस्ट) मुंबई, आरेमिल्क कॉलनी, मुंबई, महाराष्ट्र ४०००६५ ह.मु. डागाचीवाडी ता. पाटोदा जि. बीड.

विरूध्द निरंक

मागणी अर्ज:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. वरील अर्जदार क्र. १, २ व २ अ) २ ब) यांनी या न्यायालयात मयत त्रिंबक पि. यशवंता मिसाळ यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.ज्याअर्थी त्रिंबक पि. यशवंता मिसाळ यांचा मृत्यु दिनांक २८/१०/२०२२ रोजी डागाचीवाडी ता. पाटोदा जि. बीड येथे झाला असुन अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क्र. २ ही मयताच्या मयत मुलाची पत्नी असून मयताची सून आहे. तसेच अर्जदार क्र. २ अ व २ ब हे मयताच्या मयत मुलाचे अनुक्रमे अज्ञान मुलगी व अज्ञान मुलगा आहेत. वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत अथवा त्यांच्या व्यतिरीक्त इतर कोणी मयताचे वारस आहेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत त्रिंबक पि. यशवंता मिसाळ यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १३ ऑक्टोबर २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १९ नोव्हेंबर २०२६.

स्वाक्षरित
क. लिपीक

आदेशावरुन
स्वाक्षरित
सहाय्यक अधिक्षक,
दिवाणी न्यायालय, क. स्तर, पाटोदा.
ता. पाटोदा, जि. बीड.

**जाहिरनामा**

**मा. श्रीमती एस. डी. सोनी २ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता.जि. बीड यांचे न्यायालयात**

**दिवाणी किरकोळ अर्ज १६५१/२०२६**

**सुवर्णा लक्ष्मण जागडे वि. निरंक**

**विधीज्ञ मात्रे जी. ए.**

**मागणीः- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम २ प्रमाणे कायदेशीर वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

अर्जदारः १. सुवर्णा भ्र. लक्ष्मण जागडे, वय ४५ वर्षे, धंदा-घरकाम, रा. वायबटवाडी, ता.जि. बीड. २. विनोद पि. लक्ष्मण जागडे, वय २५ वर्षे, धंदा शेती, रा. वायबटवाडी, ता.जि.बीड. ३. मनोज पि. लक्ष्मण जागडे, वय २४ वर्षे, धंदा शेती, रा. वायबटवाडी, ता.जि. बीड. ४. किसनाबाई भ्र. अश्रुबा जागडे, वय ७० वर्षे, धंदा-घरकाम, रा. वायबटवाडी, ता.जि. बीड. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

ज्याअर्थी मयत नामे लक्ष्मण पि. अश्रुबा जागडे यांचा मृत्यु दिनांक ०२/१०/२०२५ रोजी जिल्हा रूग्णालय, बीड ता.जि.बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क्र. २ व ३ हे मयताचे मुले तर अर्जदार क्र. ४ ही मयताची आई आहे. मयतास मुलगी नाही. अर्जदारांशिवाय मयतास कोणीही वारसदार नाहीत. मयत नामे लक्ष्मण पि. अश्रुबा जागडे यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून अमे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहु मयत नामे लक्ष्मण पि. अश्रुबा जागडे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर प्रकरणात पुढील तारीख २३.११.२०२६ आहे.

आज दिनांक १३.१०.२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

स्वाक्षरित
क. लिपीक
२ रे सह दिवाणी
न्यायालय व. स्तर बीड

आदेशावरून
स्वाक्षरीत
अधिक्षक
दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड

## पीक कर्जासाठी लिंबागणेश येथे रास्ता रोको आंदोलन!

### वैयक्तिक व जामीनदाराच्या थकीत कर्जामुळे महाराष्ट्र ग्रामीण बँकेकडून पिक कर्ज नाकारल्याच्या निषेधार्थ:डॉ. गणेश ढवळे

लिंबागणेश। प्रतिनिधी

ऐन दुष्काळात शेतकऱ्यांना पिक कर्ज मिळण्यात अडथळे येत असल्याच्या निषेधार्थ गुरुवारी सकाळी बीड तालुक्यातील बालाघाटावरील लिंबागणेश येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. वैयक्तिक कर्जाची थकबाकी तसेच जामीनदाराच्या खात्यावरील थकीत देयकांमुळे महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या लिंबागणेश शाखेकडून पिक कर्जाचे अर्ज पुढील प्रक्रियेसाठी स्वीकारले जात नसल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र राज्याचे मुख्य प्रचारप्रमुख डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले.

महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या लिंबागणेश शाखेत पिक कर्जासाठी अर्ज करणाऱ्या शेतकऱ्यांना वैयक्तिक कर्जाची थकबाकी किंवा जामीनदाराच्या खात्यावरील थकीत देयकांमुळे अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले. संबंधित कर्जखाती नियमित करून अद्ययावत केल्यानंतरच पुढील प्रक्रिया करता येईल, अशी भूमिका बँकेकडून घेतली जात असल्याचा आरोपही करण्यात आला.आधीच दुष्काळामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना पेरणी, खते, बियाणे आणि अन्य शेती खर्चासाठी पैशांची गरज आहे. अशा परिस्थितीत पिक कर्जाच्या प्रक्रियेत अडथळे



येत असल्याने शेतकऱ्यांची आर्थिक, शारीरिक आणि मानसिक पिळवणूक होत असल्याचे डॉ. गणेश ढवळे यांनी नमूद केले.इतर कर्जखात्यांवरील थकबाकीमुळे जामीनदार असलेल्या शेतकऱ्यांना पिक कर्ज नाकारण्याबाबतच्या अटी शिथिल कराव्यात, तसेच पात्र शेतकऱ्यांना पिक कर्ज मिळण्यातील अडचणी तातडीने दूर कराव्यात, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. दुष्काळामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न घटले असताना बँका, मायक्रोफायनान्स कंपन्या, फायनान्स कंपन्या आणि खासगी सावकारांकडून कर्जवसुलीसाठी तगादा लावला जात असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन सक्तीच्या कर्जवसुलीला आळा घालावा आणि नियमबाह्य वसुली करणाऱ्यांवर आवश्यक कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे उपविभागीय व्यवस्थापक योगेश गुप्ता, वरिष्ठ व्यवस्थापक प्रवीण मुळे, लिंबागणेश शाखेचे व्यवस्थापक सोन्याबापू रासकर, पाटोदा शाखेचे व्यवस्थापक एस. बी. शिंदे, महसूल प्रशासनाच्या मंडळ अधिकारी उज्ज्वला राऊत, ग्राममहसूल अधिकारी गणपत पोतदार तसेच पोलीस प्रशासनातील पोलीस उपनिरीक्षक धायगुडे, पोलीस हवालदार नवनाथ मुंडे, तांबे आणि बाला ढाकणे यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पालकमंत्री, महसूलमंत्री, कृषिमंत्री आणि विभागीय आयुक्त यांना निवेदन देण्यात आले.पिक कर्ज वितरणातील अडचणी दूर करणे, जामीनदार शेतकऱ्यांबाबतच्या अटींमध्ये आवश्यक शिथिलता देणे, नेकनूर डीसीसी बँकेतील कथित अडवणूक थांबविणे आणि सक्तीच्या कर्जवसुलीच्या तक्रारींवर कारवाई करणे, या प्रमुख मागण्या निवेदनाद्वारे करण्यात आल्या. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना वेळेत पिक कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी बँक प्रशासन आणि शासनाने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी डॉ. गणेश ढवळे यांनी केली.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
शुक्रवार दि.१६ ऑक्टोबर २०२६ 

# क्षीरसागर बरे होते म्हणण्याची बीडकरांवर वेळ

## पंधरा दिवसालाही पाणी नाही: ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग: नाल्या तुंबलेल्या

**बीड । प्रतिनिधी**

बीड नगरपरिषद मधील सत्ता राष्ट्रवादी काँग्रेस अजितपवार पक्षाच्या जनतेने ताब्यात दिली प्रामुख्याने फार मोठ्या अपेक्षा जनतेच्या होत्या मात्र त्या पूर्ण होत नसताना दिसत आहेत बीड शहराला पंधरा दिवसाला देखील पाणी नियमित मिळत नाही शहरात ठीक ठिकाणी कचऱ्याचे ढीग दिसतात नाल्या तुंबलेल्या दिसतात त्यामुळे आता सत्ता देणारे नागरिकच क्षीरसागरच बरे होते असे उघडपणे बोलत आहेत.

क्षीरसागर यांना सत्तेतून बाहेर काढा अशी विरोधकाने हाक देत जनतेने देखील राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला कौल दिला प्रामुख्याने गेल्या अनेक वर्षापासून बीड नगरपालिका क्षीरसागर यांच्या ताब्यात आहे माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचे बंधू डॉक्टर भारत भूषण क्षीरसागर हे अध्यक्ष म्हणून कायमच राहिले आहेत मग ते जनतेमधून असो नगरसेवकांमधून बीड शहरांमध्ये अनेक अडचणी आल्या तरी त्याला तोंड देण्याची ताकद डॉक्टर भारतभूषण क्षीरसागर यांच्यामध्ये होती त्यांच्यावर आरोप देखील झाले मात्र ते खचले नाहीत जनतेच्या अडचणी सोडविण्यात येत तत्पर दिसायचे परंतु गेली अनेक वर्ष त्यांच्याकडे सत्ता असल्याने नागरिकच आता बदल म्हणून त्यांना दूर ठेवले गेले क्षीरसागरांना सत्तेपासून



दूर ठेवले असे नाही एक क्षीरसागर सत्तेमध्ये वाटेकरी आहेत त्यांच्या वाट्याला काय मिळाले हा संशोधनाचा विषय असला तरी राष्ट्रवादीचे नेते माजी आमदार अमरसिंह पंडित व त्यांचे बंधू गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली बीड नगरपालिका ताब्यात घेण्यात आली निवडणुकीमध्ये अनेक आश्वासने दिली जनतेला वाटले आता बदल झाला आहे शहरात स्वच्छता कचऱ्याचे ढीग दिसणार नाही वेळेवर पाणी मिळेल मात्र या सर्व आशेवर पाणी फिरत असल्याचे दिसत आहे बीड शहरातील अनेक भागांना गेल्या पंधरा दिवसापासून पाणी नाही याची जबाबदारी मात्र नगरसेवक घेतात नगराध्यक्ष ना नेतृत्व नाल्या तुंबलेल्या आहेत सफाई होत नाही खरे पाहिले तर जनतेने मोठ्या अपेक्षेने पंडिताकडे जबाबदारी दिली मात्र त्यांना ती पिलवते की नाही हाच महत्त्वाचा विषय आहे मध्यंतरी सत्ताधाऱ्यांमध्येच दोन गट पडले होते कसे तरी करून हा वाद शमवण्याचे काम वरिष्ठ पातळीवरून झाले मात्र जनतेचे काय हा देखील मोठा प्रश्न आहे आता वाद मिटले असतील तर पाणी स्वच्छता याकडे लक्ष देण्याची गरज आहे मात्र तसे होताना दिसत नाही त्यामुळे आता बीड शहरातील जनताच बोलत आहे की क्षीरसागरच बरे होते.

# प्रत्येक संघर्षात सतीश भाऊ माझ्या तर मी सतीश भाऊंच्या पाठीशी कायम उभे राहिलो - धनंजय मुंडे

परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी

आ. सतीश चव्हाण हे २००८ तर मी २०१० साली विधानपरिषदेत पहिल्यांदा गेलो. स्व. अजितदादांच्या नेतृत्वात काम करत असताना प्रत्येक संघर्षाच्या काळात सतीश भाऊ चव्हाण माझ्या तर त्याच्या संघर्षात मी त्यांच्या पाठीशी कायम उभे राहिलो, असे आगळेवेगळे आमचे नाते असल्याचे मत माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी व्यक्त केले.

मराठवाडा पदवीधर मतदारसंघ विधानपरिषदेच्या निवडणुकीतील



महायुतीचे अधिकृत उमेदवार सतीश चव्हाण यांच्या प्रचारार्थ आज परळी येथील अक्षता मंगल कार्यालयात महायुतीचा पदवीधर मेळावा आ. धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली संपन्न झाला, त्यावेळी ते बोलत होते.

२०१३ मध्ये मी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केल्यानंतर एका वेगळ्या व भावनिक परिस्थितीत मी विधानपरिषद निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने माझा उमेदवारी अर्ज दाखल केला, त्यावेळी माझ्या सोबतीला सतीश भाऊ खंबीरपणे उभे होते, असे म्हणत उमेदवारी अर्ज भरतानाचा तो फोटोच मुंडेंनी भर सभेत स्क्रीनवर दाखवला!

### अजितदादांची आठवण आणि मेळावा भावनिक

धनंजय मुंडे यांनी आपल्या भाषणाच्या सुरुवातीला स्व. गोपीनाथराव मुंडे, आज जयंती असलेल्या भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची आठवण काढत आमचे नेते स्व. अजितदादा पवार यांच्या नंतर ही पहिलीच निवडणूक लढवत असून त्यांच्या नेतृत्वाची आणि त्यांनी आमच्यावर नेहमी व्यक्त केलेल्या विश्वास आणि प्रेमाची आठवण प्रकर्षाने जाणवते, अशा शब्दात स्व. अजितदादांच्या आठवणींना उजाळा दिला, त्यावेळी संपूर्ण सभागृह भावनिक झाले होते.

# शिक्षण विभागातील वरिष्ठ लिपिक डोईफोडे निलंबित

बीड । प्रतिनिधी

कार्यालयातील वैद्यकीय प्रतिपूर्ती देयकाचा कार्यभार अन्य वरिष्ठ सहाय्यकाकडे देण्याचे स्पष्ट निर्देश असताना वरिष्ठांच्या आदेशांचे उल्लंघन केले. तसेच संचिका प्रदीर्घ काळ प्रलंबित ठेवल्या प्रकरणी बीड जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागातील वरिष्ठ सहाय्यक लिपिक श्रीमती के. एस. डोईफोडे यांना निलंबित करण्यात आले आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान यांनी बुधवारी सदर आदेश निर्गमित दिले.

या संदर्भात माहिती अशी की, शिक्षण विभागातील वरिष्ठ लिपिक डोईफोडे यांच्याकडील वैद्यकीय पदभार श्रीमती डोईफोडे यांच्याकडे होता. गेल्या एक महिन्यापूर्वी सदर ◀◀ पान ३ वर

### .. सीईओ साहेब अशीच कारवाई झाली तर अनेकजण घरी जातील

कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी निलंबन करण्यात आल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे. बीड जिल्हा परिषदेत मलिदा मिळाल्याशिवाय काम करायचे नाही. अधिकाऱ्याचे आदेश मानायचे नाही, धाब्यावर बसविणे आणि कामचुकारपणा करणे, अनेकांसाठी नित्याचे आहे. अशीच कठोर कारवाई केली तर अर्धेअधिक कर्मचारी निलंबित होतील, अशी चर्चा होत आहे.

# माजलगाव येथे दुकान फोडून मोबाईल लांबवणारा चोरटा जेरबंद; १ लाख ७२ हजारांचे २० मोबाईल जप्त

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकाजवळील सुपर मोबाईल शॉपीचे शटर फोडून महागडे मोबाईल पळवणाऱ्या सराईत चोरट्याला माजलगाव शहर पोलिसांनी शिताफीने बेड्या ठोकल्या आहेत. पोलिसांनी त्याच्याकडून १ लाख ७२ हजार रुपये किमतीचे २० मोबाईल जप्त केले आहेत. शाहरुख ऊर्फ शाकेर हमीद शेख (वय अंदाजे, रा. सरफराज नगर, जि. परभणी) असे अटक करण्यात आलेल्या




आरोपीचे नाव आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, २५ ऑगस्ट २०२६ रोजी पहाटे चारच्या सुमारास अज्ञात चोरट्याने माजलगाव येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातील सुपर मोबाईल शॉपीचे दुकान फोडून आतील मोबाईल लांबवले होते. या प्रकरणी दुकान मालकाच्या फिर्यादीवरून माजलगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक २८०/२०२६, कलम ३०५ (अ), ३३४ (४) भारतीय न्याय संहिता (BNS) २०२३

◀◀ पान ३ वर

### माजलगाव शहर पोलिसांची धडक कारवाई; परभणीच्या आरोपीला अटक

# आष्टी पोलीस ठाण्यात शासकीय कामात अडथळा, महिला पोलिसांसह कर्मचाऱ्यांना मारहाण!

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी पोलीस ठाण्यात शासकीय कर्तव्य बजावत असलेल्या पोलीस अधिकारी व महिला पोलीस कर्मचाऱ्यांशी गैरवर्तन करून त्यांच्यावर हल्ला केल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी तीन जणांविरुद्ध आष्टी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपींना अटक करून सध्या एम.सी.आर.मध्ये ठेवण्यात आल्याची माहिती पोलिसांच्या प्रसिद्धीपत्रकातून देण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आष्टी पोलीस ठाण्यात शासकीय कामकाज सुरू असताना आरोपी प्रसाददेवी भागवत

### महिला पोलिसाच्या गळ्यातील ओढणीने गळा आवळण्याचा प्रयत्न; दातांनी चावा घेतल्याचाही आरोप

निकाळजे, रुक्मिणी भागवत निकाळजे आणि ऋषिकेश भागवत निकाळजे यांनी फिर्यादी महिला पोलिसाच्या जिवे मारण्याच्या उद्देशाने गळ्यातील ओढणीने गळा आवळण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे. तसेच वाईट उद्देशाने हात लावून विनयभंग केल्याचेही तक्रारीत नमूद आहे.

यावेळी साक्षीदार सोडविण्यासाठी पुढे आले असता, त्यांनाही दातांनी चावा घेऊन जखमी केल्याचा आरोप आहे. याशिवाय फिर्यादी व साक्षीदारांना अश्लील भाषेत शिवीगाळ करून शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे.

विविध कलमान्वये गुन्हा दाखल

या प्रकरणी आष्टी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ४८४/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेतील कलम १०९(१), १३२, ७४, १२१(१), ११५(२), ३२४(४), ३५२, ३५१(२) आणि ३(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक सूर्यवंशी करीत असून, पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार संबंधित आरोपींना अटक करण्यात आली ◀◀ पान ३ वर

# पात्रुड-जीवनपूर रस्त्याच्या साईड पट्ट्या दोन दिवसात न भरल्यास तीव्र रस्ता रोको आंदोलन - युवकांचा इशारा

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगांव तालुक्यातील पात्रुड-जीवनपूर हा अत्यंत महत्त्वाचा आणि मुख्य रहदारीचा रस्ता असून या रस्त्याच्या दोन्ही बाजूच्या साईड पट्ट्या मोठ्या प्रमाणात खचलेल्या आहेत. त्यामुळे वाहनचालक, विद्यार्थी, शेतकरी तसेच सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून अपघाताचा धोका निर्माण झाला आहे.

या गंभीर समस्येबाबत वारंवार



निवेदने व मागण्या केल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत साईड पट्ट्या भरण्याचे काम सुरू करण्यात आले होते. मात्र, पात्रुड पासून लोणगाव पर्यंत साईड पट्ट्या भरण्याचे काम करण्यात आले असून, तेथून पुढे जीवनपूरच्या दिशेने जाणाऱ्या रस्त्याचे काम अचानक ◀◀ पान ३ वर

# दुष्काळ आणि नापिकीला कंटाळून शेतकऱ्याची आत्महत्या

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई तालुक्यातील राडी गावातील शेतकरी अंकुश रंगनाथ गंगणे (वय ६४ वर्षे, रा. राडी, ता. अंबाजोगाई) यांनी शेतातील नापिकी आणि दुष्काळी परिस्थितीमुळे टोकाचे पाऊल उचलत आपल्या राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना गुरूवार १५ ऑक्टोबर रोजी घडली आहे.



स्थानिकांनी दिलेल्या माहितीनुसार अंकुश गंगणे यांच्या नावे सुमारे एक हेक्टर शेती आहे. गेल्या हंगामात पावसाअभावी पिके हातात आली नाहीत. सततच्या नापिकीमुळे ते चिंतेत होते, असे गावकऱ्यांनी सांगितले.

अंकुश रंगनाथ गंगणे यांच्याकडे फक्त एक हेक्टर जमीन असून ही जमीनही माळरानावरची आहे. यावर्षी अत्यंत ◀◀ पान ३ वर

# दसरा मेळाव्यास भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे -कचरे ,रत्नपारखी ,डॉ. सोळंके

**माजलगाव । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यातील संतश्रेष्ठ भगवान बाबांची पवित्र जन्मभूमी असलेल्या सावरगाव घाट (भगवान भक्ती गड) येथे सोमवार, दिनांक २० ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता भव्य दसरा मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.




या मेळाव्यास महाराष्ट्राच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री लोकनेत्या नामदार पंकजाताई मुंडे साहेब यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. संतश्रेष्ठ भगवान बाबांच्या जन्मभूमीमुळे सावरगाव घाटला केवळ धार्मिकच नव्हे, तर ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले आहे. भगवान बाबांनी आयुष्यभर सर्व समाजालाच शिक्षण, व्यसनमुक्ती आणि अंधश्रद्धा निर्मूलनाचा संदेश दिला. त्यांच्या विचारांचा वारसा जपणाऱ्या या पवित्र भूमीत होणाऱ्या दसरा मेळाव्याबद्दल भाविकांमध्ये मोठी उत्सुकता आणि श्रद्धा आहे.

लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांच्या उपस्थितीत होणारा हा दसरा मेळावा केवळ एक कार्यक्रम नसून, तो भगवान बाबांच्या विचारांचे दर्शन आहे. सर्व समाजातील नागरिकांनी, युवकांनी, माता-भगिनींनी या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे भावनिक आवाहन किट्टी-आडगाव मंडळाच्या अध्यक्षा रुपाली कचरे, माजलगाव शहर मंडळाचे अध्यक्ष विनायक रत्नपारखी आणि पाथरूड मंडळाचे अध्यक्ष डॉ. अभिजीत सोळंके यांनी केले आहे.

# हनुमानवस्तीवरील अंगणवाडी चौकशी अहवालावरून वाद; शाखा अभियंत्यांचा अहवाल बनावट असल्याचा आरोप

केज । प्रतिनिधी

केज तालुक्यातील जिवाची वाडी येथील हनुमानवस्तीवर होत असलेल्या अंगणवाडी बांधकामासंदर्भात बांधकाम विभागाचे शाखा अभियंता शरद वीर यांनी सादर केलेला चौकशी अहवाल पूर्णपणे खोटा, बनावट आणि एकांगी असल्याचा गंभीर आरोप अर्जदार व ग्रामस्थांनी केला आहे. याप्रकरणी गटविकास अधिकारी, पंचायत समिती केज यांच्याकडे लेखी निवेदन देत हा अहवाल रद्द करण्याची मागणी करण्यात आली आहे.



नेमका वाद काय?

ग्रामपंचायत जिवाची वाडी अंतर्गत येणाऱ्या हनुमानवस्तीवरील अंगणवाडीचे बांधकाम थांबवण्यासाठी काही पत्रे व अहवाल तयार करण्यात आले आहेत. मात्र, हे करताना शाखा अभियंता शरद वीर यांनी दोन्ही बाजूंचे म्हणणे न ऐकता केवळ एकतर्फी आणि बनावट अहवाल सादर केला असल्याचा संताप ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.

शासकीय नियम व ठराव डावलल्याचा दावा

निवेदनात नमूद केल्यानुसार, या प्रकरणात यापूर्वी झालेले शासन निर्णय, शासन परिपत्रके, ग्रामसभा व ग्रामपंचायतीचे कायदेशीर ठराव तसेच जिल्हा परिषद व बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांकडे दिलेली कागदपत्रे आणि पत्रे कोणत्या व कोणत्या आधारावर रद्द केली, असा सवाल उपस्थित करण्यात आला आहे. याआधीच्या पत्रांच्या अधीन राहून वस्तीवरील लहान मुलांना न्याय देणे आवश्यक असताना, चुकीच्या आणि खोट्या पत्रव्यवहाराआधारे बालकांच्या हक्काची अंगणवाडी रखडवली जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

> “ हनुमानवस्तीवरील अंगणवाडी बांधकामासंदर्भात शाखा अभियंता शरद वीर यांनी चौकशी करून अहवाल सादर केला होता. मात्र, त्यांनी दोन्ही बाजूंचे म्हणणे एकूण ज्या ठिकाणी बांधकाम करायचा आहे ते करू शकतात अशी सांगितले.
>
> शाखा अभियंता शरद वीर (बांधकाम विभाग)

> “ या प्रकरणात अंगणवाडीचे बांधकाम थांबवण्यासाठी दिलेले पत्र आणि घडामोडींच्या विरोधात आक्रमक भूमिका घेणारे हे प्रमुख अर्जदार व तक्रारदार आहेत. त्यांनी शाखा अभियंत्याचा अहवाल व त्याआधारे दिलेले पत्र पूर्णपणे खोटे व बनावट असल्याचे पुराव्यानिशी निवेदनात मांडले आहे. वस्तीवरील लहान मुलांना न्याय मिळावा आणि अंगणवाडीचा मार्ग मोकळा व्हावा, यासाठी ते कायदेशीर लढा देत आहेत.
>
> तक्रारदार सीताराम भिकाराम सारुक

# माजलगाव महाराष्ट्र ग्रामीण बँकेसमोर किसान सभेच्यावतीने धरणे आंदोलन!

माजलगाव । प्रतिनिधी

मोठीवाडी येथील शेतकऱ्यांच्या वतीने महाराष्ट्र ग्रामीण बँके समोर धरणे आंदोलन करण्यात आले. या धरणे आंदोलनातून पात्र शेतकऱ्यांना नवीन पीक कर्जाचे वाटप तातडीने करण्यात यावे,शासनाच्या लागू असलेल्या परिपत्रक व मार्गदर्शक सूचनानुसार पीक कर्जाचे वाटप करण्यात यावे, मयत शेतकऱ्यांची माहिती संबंधित कार्यालयात लवकरात लवकर कळवून पात्र वारसांच्या नावे नियमानुसार कर्ज पुरवठा करण्यात यावा,पीक कर्जासाठी लावण्यात येणारे शिबिल संदर्भातील अट रद्द




शिथिल करण्यात यावी, खातेदाराच्या जामीनदाराकडून सक्तीची वसुली करण्यात येऊ नये,पीक कर्जासाठी आवश्यक असलेल्या बेबाकी प्रमाणपत्राची अट रद्द शिथिल करण्यात यावी,पीक कर्जाची एग्रीमेंट फाईल पाच वर्षासाठी न करता ऐच्छिक शेतकऱ्यांच्या मनावर करण्यात यावी,या ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26